# अनुक्रमणिका


- स्थिर व प्रगतशील भारतासाठी काँग्रेस-राष्ट्रवादीची सत्ता हवी ........................ संपादकीय .................... २
- पुण्याच्या काँग्रेस भवनातील सभा : मान्यवरांची भाषणे
  १) धर्मांध व जातीयवाद्यांना रोखणे ही राष्ट्रीय गरज .................................. शरद पवार .................... ७
  २) जातीयवाद्यांचा डाव हाणून पाडा .................................................. अशोक चव्हाण .................... १५
  ३) सेना-भाजपचा सत्यानाश करायचाय .............................................. रामदास आठवले .................... १६
  ४) अफवांवर विश्वास ठेवू नका .................................................. माणिकराव ठाकरे .................... १६
  ५) पवारांनीच मला राजकारणात आणले ............................................. सुरेश कलमाडी .................... १७
  ६) आयुष्याच्या नवीन वळणावर मी उभी .............................................. सुप्रिया सुळे .................... १७
  ७) भाजपवाले उद्या कसाबलाही सोडतील ........................................ गोविंदराव आदिक .................... १८
- गुजरात उच्च न्यायालयाची मोदी सरकारला चपराक ................................ दिनकर तावडे .................... १९
- अन् बाळ वरुणला कंठ फुटला .................................................... प्रकाश बिनसाळे .................... २५
- भाजपवर रा. स्व. संघाची पुन्हा मजबूत पकड ............................................ मुकुंदानंद .................... २९
- बहुजनांचे क्षेपणास्त्र .............................................................. प्रा. लक्ष्मण ढोबळे .................... ३३
- नरेंद्रभाईंचा नवा 'जावईशोध' अर्थात 'भुताहाती भागवत' ............................. हेमंत टकले .................... ३७
- बदलणाऱ्या राजकीय समीकरणांची नांदी ? ............................................. विजय नाईक .................... ४१
- राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची अहमदनगरची सभा : मान्यवरांची भाषणे ..........................................
  १) हिंदुस्थानच्या मजुबतीची ताकद महाराष्ट्राच्याच मनगटात ............................ शरद पवार .................... ४९
  २) आता सह्याद्रीलाच हिमालय बनवू.......................................... आर. आर. पाटील .................... ५५
  ३) महाराष्ट्राचा पंतप्रधान व्हावा .................................................. छगन भुजबळ .................... ५८
  ४) पवार हे विकासाच्या वाटेने जाणारे नेते........................................ गोविंदराव आदिक .................... ६१
  ५) पवार हे या भूमीला पडलेले सुंदर स्वप्न ...................................... यशवंतराव गडाख .................... ६४
- राष्ट्रवादीचा जाहीरनामा विकासाभिमुख व परिवर्तनशील............................................................ ६५
- आता ध्येय संत्री उत्पादन क्षेत्राच्या प्रगतीचे ............................................. शरद पवार .................... ७०
- भारत जगातील अव्वल ज्ञानोत्पादन केंद्र बनण्याच्या मार्गावर ............... डॉ. रघुनाथ माशेलकर .................... ७७
- सामाजिक विकासात गुजराथचे स्थान १७ वे ............................................ अनुष मालेकर .................... ८१
- भारताने न्यूझीलंडला दमविले तर 'ऑसीस' ने द. आफ्रिकेस नमविले .................. मुकुंद मोघे .................... ९०



प्रबंध संपादक
**आर. आर. पाटील**
वर्ष पहिले
अंक : **नववा**
या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी संपादक व प्रबंध संपादक सहमत असतीलच असे नाही.

संपादक :
**डॉ. सुधीर भोंगळे**

संपादकीय पत्रव्यवहार
राष्ट्रवादी भवन, शासकीय कुटीर क्र. २१, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई - ४०० ०२१
दूरध्वनी : ३०२३५५१८/५५/५६

व्यवस्थापकीय संचालक
**हेमंत टकले**
संकलन सहभाग :
**बाळासाहेब लासुरे**
वितरण व्यवस्था :
**डॉ. गजानन देसाई**
निर्मिती व्यवस्था :
**जितेंद्र गोस्वामी**
मुखपृष्ठ रचना :
**दिलीप रोडे, पुणे**

**वर्गणीचे दर :**
**वार्षिक रु. २००/-**
**आजीव रु. २०००/-**
(दिवाळी अंकासह)

हे मासिक
www.mhncp.org
यावर उपलब्ध आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकरिता मुद्रक, प्रकाशक श्री. आर. आर. पाटील यांनी मयुर प्रिंटर्स, ५०६/मयुरेश, दत्ताराम लाड मार्ग, काळाचौकी, मुंबई -३३ येथे छापून राष्ट्रवादी भवन, शासकीय कुटीर क्र. २१, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई - २१, येथून प्रकाशित केले.

# स्थिर व प्रगतशील भारतासाठी काँग्रेस-राष्ट्रवादीची सत्ता हवी.



लोकसभा निवडणुकांना प्राप्त परिस्थितीत निर्णायक महत्व आहे. आजची परिस्थिती जागतिक व देशांतर्गत पातळीवर अस्थिर, गुंतागुंतीची आणि सावधपणाची गरज असणारी अशी आहे. यासंदर्भात पुढच्या पाच-दहा वर्षात भारतीय लोक, समाज आणि राष्ट्र यांचे हित सांभाळण्याकरिता काळजीपूर्वक विचार व कृती करावी लागणार आहे. आत्ताच्या दोलायमान परिस्थितीत सर्वच राज्यांमध्ये पण विशेषतः केंद्र सरकारमध्ये स्थिर, कार्यक्षम, पुरोगामी, सर्वसामान्य जनतेच्या आशा-आकांक्षाशी इमान राखणारे आणि संवेदनाक्षम शासन असणे ही काळाची नितांत गरज आहे. याच्याच जोडीला सर्व प्रश्नांचा तात्विक व व्यावहारिक आवाका असणारे, सर्वांना सामावून घेण्याची पात्रता असलेले आणि दूरदृष्टीचे कणखर नेतृत्वही केंद्र शासनाला लाभणे ही ही तितकीच महत्त्वाची गरज आहे.

आंतरराष्ट्रीय व देशांतर्गत परिस्थितीचा विचार केला तर आपल्या देशाला व लोकशाहीला असलेला पहिला धोका दहशतवादाचा आहे. दहशतवाद वेगवेगळे बुरखे पांघरून वेगवेगळ्या सामाजिक स्तरांमध्ये घुसू पाहात आहे. दहशतवाद्यांना धर्माचे सोयरसुतक नसते. पण डावपेचाचा भाग म्हणून इस्लामच्या नावाखाली अल्‌कायदा आणि तालिबानी संघटना जगाच्या वेगवेगळ्या भागात जाणूनबुजून माणुसकीशून्य हिंसा करीत आहेत. दक्षिण आशियाचा विचार केला तर अफगाणिस्तानच्या जोडीला तालिबानी धर्मांध दहशतवादी शक्ती पाकिस्तानात धुमाकूळ घालीत आहेत. त्यांचे आणि पाकिस्तानच्या राज्यकर्त्यांपैकी काही गटांचे तसेच पाकिस्तानी लष्कर, गुप्तहेर संघटना आणि नागरी प्रशासन यांच्यातील बऱ्याच गटांचे मेतकूट जमलेले आहे. परिणामी पाकिस्तान आज अराजक सदृश्य अस्थिर परिस्थितीतून जात आहे. अशा अस्थिर पाकिस्तानमुळे भारताला नाना तऱ्हेचे धोके व उपद्रव यांना सामोरे जावे लागणार आहे. त्याच्याच जोडीला पाकिस्तानस्थित तालिबानी दहशतवादी संघटना भारतात विविध ठिकाणी उत्पात घडवून आणत आहेत. मुंबईवर झालेला हल्ला हा अशाच एका मोहीमेचा भाग होता. आज काश्मिरपासून कन्याकुमारीपर्यंत इस्लामच्या नावाने दहशत माजविणाऱ्या शक्तींचे जाळे वाढत आहे.

त्याचवेळी भारतातील अनेक संघटना हिंदु हिताच्या नावाखाली लोकांचा बुद्धीभेद करुन स्वतःचे दहशतवादी धोरण राबवित आहेत. त्यामुळे हिंदु-मुसलमानांच्या मधली तेढ पद्धतशीर वाढविली जात आहे आणि नाना तऱ्हेच्या कुरापतखोर कृत्यांना आज हात घातला जात आहे. मालेगाव अशा कारवायांना बळी पडलेले आहे. अशा लोकशाहीला घातक असलेल्या दहशतवादी कृत्यांना आळा घालू पाहणाऱ्या खंबीर व कार्यदक्ष अधिकाऱ्यांवर तोंडसुख घेतले जात आहे. दिवंगत हेमंत करकरे यांच्यासारख्या निःस्पृह आणि कायद्याने चालणाऱ्या पोलिस अधिकाऱ्याविरुद्ध महाराष्ट्रातल्या जातीयवादी शक्तींनी केवढा गहजब माजविला होता ही गोष्ट जगजाहीर आहे. एकीकडे भारताला धोका

पोहचविणाऱ्या दहशतवाद्यांच्या विरुद्ध कडक कारवाईची भाषा करावयाची पण त्याच वेळी घटनाबाह्य कृत्ये करणाऱ्या दहशतवादी हिंदुत्ववादी संघटनांना जरब बसविणाऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध नाना तऱ्हेचे दोषारोप करावयाचे ही एक अजब राजकीय खेळी व नीती आहे. थोडक्यात, विविध मुखवटे धारण केलेल्या दहशतवादाची काळोखी छाया दक्षिण आशिया व विशेषतः भारतावर पडत आहे. दहशतवाद्यांकडे भरपूर शस्त्रास्त्रे, अब्जावधींचा निधी आणि मोठी प्रचार यंत्रणा आहे. त्यामुळे दहशवादाला निर्धाराने तोंड द्यावेच लागणार आहे हे आपल्या देशापुढील व लोकशाहीसमोरील सर्वात मोठे आव्हान आहे.

जगाला व भारताला दुसरा धोका आहे तो वर्तमानकालीन आर्थिक पेचप्रसंगाचा. अफाट सत्ता आणि तितकीच हाव यामुळे अमेरिकेतील काही बलाढ्य गटांनी नाना तऱ्हेच्या युक्त्या लढवून गबर पैसा गोळा केला. पण त्याचा शेवट जो व्हावयाचा होता तोच झाला. असे गट तर बुडतच आहेत पण त्यांच्याच जोडीला त्यांनी अमेरिकन अर्थकारणाला मोठा तडा दिला आहे. त्यातून अमेरिकेमध्ये मंदीची मोठी लाट उसळली आहे. आर्थिक विकासाचा दर सतत खालावत आहे आणि विविध उद्योगधंदे बंद पडत असून अमेरिकेतील बेकारांचे प्रमाण सर्व पातळ्यांवर वाढत आहे. याच लाटेने युरोपमधील इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, रशिया, इटली व अन्य बारीकसारीक देश यांनाही अस्थिर व नाजुक परिस्थितीत लोटले आहे. या जागतिक मंदीचे सावट जपान व चीनवरही पसरलेले आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेने व शासनाने जी सावध व वास्तव धोरणे जागतिकीकरणाच्या प्रारंभापासून राबविली त्यामुळे आजच्या जागतिक मंदीचा मोठा फटका भारताला बसला नाही. तरीपण जागतिक मंदीच्या काळात भारताला त्याची झळ थोडीफार का होईना पण लागणारच आहे. याही प्रश्नाला तोंड देण्याकरिता स्थिर, भक्कम आणि जनसामान्यांच्या प्रश्नांची दखल घेत व्यापक आर्थिक व कार्यक्षम धोरण देऊ शकणारे सरकार ही येत्या दशकाची दुसरी मोठी मागणी असणार आहे.

जगाला व भारताला भेडसावित असलेली तिसरी गंभीर समस्या ग्लोबल वॉर्मिंगची म्हणजे पर्यावरणीय व जैविक पेचप्रसंगांची आहे. औद्योगिक क्रांतीच्या सुरुवातीपासून गेल्या अडीचशे वर्षात जी चुकीची धोरणे सर्व देशांनी राबविली त्याचे विपरीत परिणाम आज आपण आता अनुभवतो आहोत. विविध तऱ्हेच्या रासायनिक व अन्य प्रक्रियांमुळे ऑक्सिजनचा ऱ्हास होऊ लागला आहे आणि पृथ्वीला वातावरणातील अतीनील किरणांपासून वाचविणारा ओझोनचा थर विखुरला जात आहे. जागतिक तापमान सातत्याने वाढत आहे. सूर्यप्रकाश मंदावत आहे. हवामान व ऋतुमान लहरी बनत आहे. नाना तऱ्हेचे नैसर्गिक आघात त्यामुळे जगावर होत आहेत. अनेक नवनवीन संकटे रोज उद्‌भवत आहेत. पाऊस पाण्याचे प्रमाण लहरी तर बनले आहेच पण जागतिक पातळीवर आणि खुद्द भारतात पाण्याचा पुरवठा आक्रसून पाण्याचे दुर्भिक्ष्य वाढत आहे. भूगर्भातील दगडी कोळसा किंवा पेट्रोल यांसारखी उर्जा नजिकच्या काळात संपुष्टात येणार आहे पण त्याच्या बदली नवी उर्जा साधने झपाट्याने विकसीत होताना दिसत नाहीत. अमेरिकेत जैविक उर्जा (बायोफ्युएल) वाढविण्याकरिता मक्याचे उत्पादन इथेनॉलकडे वळविण्यात आले. पण त्यामुळे अन्नधान्याची जागतिक टंचाई वाढून जगातील विकसनशील देशांना व लोकांना केवढी इजा झाली आहे हे आपण जाणूनच आहोत. या कामी सर्वव्यापक, वास्तवाला धरुन असणारे आणि खंबीर धोरण स्विकारावे लागणार आहे. नाहीतर पाण्यापासून सर्व नैसर्गिक संसाधनांकरिता प्रत्येक राष्ट्रामध्ये आणि राष्ट्राराष्ट्रांमध्ये वाद, संघर्ष व युद्धे होण्याचाही दाट संभव आहे.

जगापुढचा आणि आपल्या पुढचाही चौथा प्रश्न अन्नसुरक्षेचा आहे. वाढत्या लोकसंख्येला आळा घालण्याची धोरणे स्वीकारली तरी आजच्या लोकसंख्येचाच भार लक्षात घेतला तर पुरेसे व चांगले अन्न सर्वांना पुरवून देशापुढील कुपोषण आणि दुष्काळ यांच्या संकटापासून कसे वाचवायचे हा एक मोठा प्रश्न आहे? अशा परिस्थितीत यापूर्वीच्या काँग्रेसच्या शासनामुळे भारतात पहिली हरितक्रांती झाली. आजच्या परिस्थितीत दुसरी हरितक्रांती भारतात व अन्यत्र झाली नाही तर एकूण मानवजातीलाच धोका आहे.

जगापुढे आणि भारतात किमान एवढे मोठे चार गंभीर प्रश्न असताना त्याबाबतीत मात्र भारतातील काँग्रेसविरोधी पक्ष उथळ व वावदूकपणाच्या भूमिका घेत असतात. ही गोष्ट मोठ्या दुर्दैवाची आहे. ती चिंताजनक तर आहेच पण असल्या पोकळ धोरणांमुळे देशहिताला व लोककल्याणाला निश्चितपणे धोका पोहोचणार आहे.

काँग्रेसविरोधी पक्ष व प्रवृत्ती दोन छावण्यात विभागल्या गेल्या आहेत. पहिली छावणी आहे हिंदुत्ववाद्यांची. दुसरी आहे मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखालील तथाकथित डाव्यांची. या पलीकडे स्वतःला तिसऱ्या छावणीचे पाईक म्हणून मिरवणाऱ्या अनेक पक्षांची आहे. पण या तिसऱ्या छावणीचा फार विचार तूर्त तरी करावयाला नको. त्यातले पक्ष म्हणजे एकेका राजकीय नेत्याभोवती जमलेले मेळावे आहेत.

त्यांना काही सुस्पष्ट धोरणे, कार्यक्रम, संघटित पक्ष असे काहीही लाभलेले नाही. भारतातील हिंदुत्ववाद्यांच्या छावणीविरुद्ध आणि काँग्रेसविरुद्ध धोरणे घेण्याच्या नावाने ही तथाकथित तिसरी आघाडी फक्त संधीसाधू राजकारणाचे प्रदर्शन करताना दिसते. म्हणून त्यांच्याविषयी अधिक बोलावयास नको.

आता हिंदुत्ववादी छावणीतल्या भारतीय जनता पक्षापासून आपण सुरुवात करू. वरच्या चार गंभीर समस्यातील दहशतवादाबद्दल भूमिका व कार्यक्रम राबविताना भाजपचे पितळ कसे उघडे पडले आहे, हे जगजाहीर आहे. पाकिस्तानने आश्रय दिलेल्या दहशतवाद्यांनी एका विमानाचे अपहरण करून ते काबूलला नेले. अशा वेळी काँग्रेस पक्ष दहशतवाद्यांबद्दल गुळमुळीत व पडते धोरण घेतात असा कांगावा सतत करणाऱ्या भाजपच्याच तत्कालीन शासनातील परराष्ट्रमंत्री असलेल्या श्री. जसवंतसिंगासारख्या मातब्बर नेत्यांनी शेपूट घालून दहशतवादवाद्यांच्या म्होरक्याला आपल्याबरोबर विमानाने नेऊन सोडून दिले. हाच दहशतवादी अझहर मसूद आज भारताविरुद्ध विषारी कारवाया करीत असून खुद्द पाकिस्तानातही धिंगाणा घालत आहे. मुंबईवर दहशतवादी हल्ला झाला त्यावेळी संयुक्त पुरोगामी आघाडीचे (युपीए) सरकार गाफील होते व त्याने अरबी समुद्रात सुरक्षेची यंत्रणा नीट उभारली नव्हती असा कांगावा भाजप व त्यांच्या मित्र शक्तींनी केला. पण वाजपेयींच्या नेतृत्वाखाली पाच वर्षे केंद्र सरकारात असताना याविषयी त्यांनी काय दक्षता घेतली याबद्दल मात्र भाजपा अवाक्षरही बोलत नाही. त्याच राजवटीत सरळासरळ संसदेवर दहशतवाद्यांनी हल्ला केला. सुदैवाने जागरुक असलेल्या सुरक्षा व्यवस्थेने तो हाणून पाडला. पण याबाबतीत आपल्या नेतृत्वाखालील शासनाचे काहीतरी चुकले होते का? याचे आत्मपरीक्षण भाजप व त्याच्या मित्रशक्तींनी आजतागायत केलेले नाही. हिंदुत्ववादी छावणीतलेच काही गट मालेगावसारख्या दंगलीत घडवून आणताहेत. हे भाजपलाही कळत असले पाहिजे. पण त्याही बाबतीत ते पडले हिंदुत्ववादी म्हणून भाजपला अळीमिळी गुपचिळी अशी भूमिका घ्यावी लागलेली दिसते. मग असला पक्ष स्वतःच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकार चालवून दहशतवादाला तोंड देणार असे म्हणू लागला तर ती गोष्ट विनोदाचीच ठरते.

आर्थिक मंदीच्या संकटालाही तोंड देण्याची क्षमता भाजपपाशी नाही हे वेगळे सांगावयास नकोच. जागतिकीकरणाच्या धोरणाला सुरुवात केंद्रात श्री. पी. व्ही. नरसिंहराव यांचे सरकार असताना झाली. तसेच जागतिकीकरणाची व मुक्त बाजारपेठेची एकूण वस्तुस्थिती लक्षात घेऊनच डॉ. मनमोहनसिंग यांच्या नेतृत्वाखालील शासनाने योग्य ते आर्थिक धोरण स्वीकारले. म्हणजेच दोन्ही वेळेला जागतिकीकरणाला छेद देणारी एकतर्फी भूमिका न घेता त्याचवेळी भारताचे हित साधले जाईल, असा मध्यम मार्ग या काँग्रेसी नेत्यांनी पक्षाच्या धोरणांचा विचार करून अंगीकारला. याउलट वाजपेयींच्या नेतृत्वाखालील एनडीए शासनाने जागतिकीकरण व शिथिलीकरणाच्या नावाने अनेक बहुराष्ट्रीय कंपन्या व देशातल्या अंबानींसारख्या बड्या भांडवलदारांवर सर्व तऱ्हेच्या सवलतींचा वर्षाव केला. भारतातील भांडवलदारी, बड्या व्यापारी आणि सट्टेबाज प्रवृत्तींना रान मोकळे केले. त्यामुळे सर्वसामान्य जनता त्रस्त झाली पण इंडिया शायनिंगचा भ्रम व बुडबुडा चमकू लागला. योग्य वेळ येताच असल्या साहसवादी भांडवलदारी कारस्थानांना विटलेल्या मतदारांनी मागच्या लोकसभा निवडणुकीत भाजपची आर्थिक धोरणे किती पोकळ, तकलादू व नाटकी असतात हे चांगला तडाखा देऊन सिद्ध केले.

जागतिक वाढत्या तापमानाचा प्रश्न व अन्य पर्यावरणाच्या प्रश्नांसकट हिंदुत्ववादी छावणीतील नेतृत्व प्रश्न कसे सोडविणार हे तर समजणे फारच कठीण आहे. या बाबतीत त्यांच्या धोरणात निश्चिती नाही; ती कुठे सुसंगत मांडलेली दिसत नाही किंवा त्याची गंभीर दखलही या मंडळींनी घेतलेली दिसत नाही. वेळ आली, नाईलाजच झाला तर काही धोरणे याबाबतीत अंगीकारली जातात पण त्यात नसते दिशा, सुसंगतपणा आणि सखोल विचारांवर आधारलेली भूमिका. हीच गोष्ट हिंदुत्ववाद्यांच्या शेतीविषयक भूमिकेविषयीही दिसून येते.

अगदी भारतीय जनसंघाच्या स्थापनेपासून ते थेट भाजप या त्याच्या नव्या अवतारापर्यंत हिंदुत्ववाद्यांना आजतागायत भारतातले ग्रामीण जीवन कळलेले नाही, ग्रामीण जनतेबद्दल त्यांना काही स्वाभाविक उमाळा, कणव दिसत नाही. शेतीच्या प्रश्नाऐवजी त्यांना भांडवलदारांचे, बनियांचे, दलालांचे, नागरी समाजाचे, पांढरपेशांचे आणि धनदांडग्या मुठभरांचे कौतुक व कल्याण करावेसे वाटते. त्यांच्याविषयी बोलताना त्यांच्या भाषेला व धोरणांना बहर येतो पण हजारो खेडेगावातील लोक आणि शेतकरी यांच्या हिताचा प्रश्न आला तर त्यांची वाणी व धोरणे अडखळताना, कच खाताना दिसतात. शेतीमालाच्या आधारभूत किमती वाजपेयींच्या काळात अवघ्या पन्नास साठ रुपयांनी वाढत होत्या. त्यांनी कधीही शेतकऱ्याला व त्याच्या मालाला रास्त किंमत दिली नाही, भांडवलदारांवर सवलतींची खैरात केली, सार्वजनिक क्षेत्रातले नफ्यात चालणारे उद्योग मातीमोल किमतीने त्यांच्या घशात घालून लाखो कामगारांचे संसार उद्ध्वस्त केले. भांडवलदारांची घरे भरली पण शेतकऱ्यांच्या डोक्यावरचा कर्जाचा बोजा उतरवावा किंवा आत्महत्या करणाऱ्या

शेतकऱ्याला त्यापासून परावृत्त करण्यासाठी काही योजना आखण्याचे कधीही सुचले नाही.

अशा प्रकारे देशाला भेडसावणाऱ्या या चारही प्रश्नांबद्दल भाजप व त्याच्या मित्र पक्षांवर विसंबून राहणे किती धोक्याचे असणार आहे याची जाण आपल्या मतदारांना नक्कीच झालेली आहे हे निःसंशय.

हीच गोष्ट मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखालील डाव्या आघाडीबद्दलही सांगता येईल. पहिलाच दहशतवादाबद्दलचा प्रश्न घेऊया. अमेरिकेने जागतिक पातळीवर व दक्षिण आशियाच्या पातळीवर दहशतवादाचा प्रश्न हाताळताना अनेक गंभीर चुका केल्या आहेत हे सर्वजण जाणतातच. या कामी अमेरिकेचे धोरण पाकिस्तानच्या बाबतीत कसे पडखाऊ असते हेही सारेजण जाणतात. पण या डाव्या मंडळींनी तेवढीच गोष्ट लक्षात घेतली आणि त्या नावाने सम्यक परराष्ट्रीय धोरण घेण्याच्या बाबतीत मात्र नाठाळपणा दाखविला. भारतापुढील उर्जेचा गंभीर प्रश्न लक्षात घेता भारताला अणुउर्जेशिवाय गत्यंतर नाही म्हणून त्याबाबतीत अधिक मोकळीक मिळण्याकरिता काँग्रेस पक्षाने व डॉ. मनमोहनसिंग यांच्या नेतृत्वाखालील युपीए सरकारने योग्य ते आंतरराष्ट्रीय धोरण व परराष्ट्रनिती स्विकारली. त्याकरिता अमेरिकेबरोबर आण्विक कराराबद्दल वाटाघाटी करताना प्रत्येक गोष्ट भारताच्या हिताची ठरावी म्हणून डोळ्यात तेल घालून आटोकाट प्रयत्न केले आणि भारताला बळ प्राप्त करुन देणारा अमेरिकेबरोबरचा आण्विक करार घडवून आणला. पण नेमक्या याच बाबतीत मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने आणि त्यांच्या मित्रपक्षांनी इतके आकांडतांडव केले, इतका एकतर्फी कांगावा केला की शेवटी त्यांच्या या भूमिकेमुळे तो पक्ष व त्यांची डावी मंडळी भारतीय जनमतापासून अलग पडली आणि त्यांचीच कोंडी झाली. खरोखरी त्यांची विचारसरणी लक्षात घेतली तर या करारावर सर्व लक्ष केंद्रित करण्याच्याऐवजी त्यांनी सर्वसामान्यांच्या प्रश्नांना प्राधान्य दिले असते तर ते सुसंगत झाले असते. पण त्यांच्या नेहमीच्या पोथीनिष्ठ व पठडीबाज धोरणांमुळे त्यांची अग्रक्रमांची मांडणी नेहमीसारखीच चुकली.

भारतापुढील गंभीर आर्थिक समस्या सोडविण्याबद्दलही मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची भूमिका अनाकलनीयच आहे. 'बैल गेला आणि झोपा केला' या न्यायाने भारताच्या औद्योगिकरणाकरीता व शेतीच्या विकासाकरिता विशेष आर्थिक क्षेत्रांच्या विकासाचे धोरण स्विकारावेच लागणार हे सर्व तज्ज्ञांना आणि जाणत्या पक्षांना केव्हाच कळून चुकले होते. पण मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने आपल्या नेहमीच्या उफराट्या भूमिकेला धरुन त्यांना कडवा विरोध केला. पण मग गेली अनेक दशके पश्चिम बंगालमध्ये सत्तारुढ असलेल्या या पक्षाला जाणवले की पश्चिम बंगालचा औद्योगिक विकास होऊन लोकांना रोजगार मिळायचा असेल तर औद्योगिकरण अटळ आहे. म्हणून बुद्धदेव भट्टाचार्य यांच्या तेथल्या शासनाने हे धोरण स्विकारले पण ते राबविताना काँग्रेसला जशी लोकमताची व जनहिताची नाडी नीट समजते ती न कळल्याने माकपने पश्चिम बंगालमध्ये विशेष आर्थिक क्षेत्रांचे धोरण राबविताना सिंगूर व नंदीग्राम यासारख्या प्रकरणी गंभीर चुका केल्या आणि गरिब व शोषणग्रस्त लोकांविरुद्धच आपला पवित्रा घेतला. श्री. पंधे यांच्यासारख्या माकपच्या वर्तुळातील अगदी वरिष्ठ नेत्याला या प्रमादांची जाहीर कबुली द्यावी लागली आहे. पण हा पक्ष त्याच्या स्थापनेपासूनच नेहमी सांप्रदायिक, पठडीबाज, पुस्तकी, पंडिती भूमिका घेत राहिला आहे आणि त्यामुळे त्याला प्रत्येक महत्वाच्या बाबतीत पूर्वीच्या धोरणांपासून माघार घेऊन पश्चातापाचा पाढा वाचावा लागला आहे. मग असा पक्ष आर्थिक मंदीचा प्रश्न असो किंवा जागतिक वाढत्या तपमानासारख्या पर्यावरणासंदर्भातील प्रश्न असो. किंवा ग्रामीण विकास वा शेतकऱ्यांचे हित हा प्रश्न असो काय दिवे लावणार आहेत हे वेगळे सांगावयास नकोच! सुदैवाने पश्चिम बंगाल किंवा त्रिपुरा किंवा केरळ ही राज्ये सोडून दिली तर या पक्षाला इतरत्र कोणीही विचारीत नाही आणि पश्चिम बंगाल व केरळमध्ये या पक्षाला आपल्या नाकर्त्या धोरणांच्यामुळे आगामी निवडणुकीत चांगलाच तडाखा बसणार आहे हे तेही ओळखून आहेत एवढे सांगितले म्हणजे पुरे.

आपल्या पुढील सर्व गंभीर प्रश्नांचा आणि त्याबाबत काँग्रेसविरोधी पक्ष व छावण्या कशा भरवशाच्या नाहीत हे आपण येथपर्यंत पाहिले. दिसते असे की असे सर्व प्रश्न सोडविण्याची क्षमता देशात फक्त काँग्रेस व युपीए परिवाराला लाभलेली आहे. ज्या ज्या वेळी काँग्रेसला स्थिर व कार्यक्षम सत्ता केंद्रात व अन्यत्र लाभली त्या त्या वेळी भारतीय लोकांचे व राष्ट्राचे पाऊल हमखास पुढेच पडलेले आहे हे इतिहासच सांगतो. पंडित जवाहरलाल नेहरु, लालबहादुर शास्त्री, इंदिरा गांधी, राजीव गांधी, नरसिंहराव यांच्यापासून ते डॉ. मनमोहनसिंग यांच्यापर्यंत काँग्रेसनेच केंद्रशासन सुरळीतपणे आणि देशाच्या दूरवरच्या हिताला धरुन राबविले आहे. काँग्रेसची ही क्षमता अजूनही आहे. त्याचे कारण काँग्रेसचे खरे बळ त्याच्या सुसंगत, संवेदनशील आणि कार्यक्षम भूमिका व धोरणात आहे. भूमिका अगदी योग्य म्हणूनच काँग्रेसच प्रभावी नेतृत्व उभारु शकते आणि मग सम्यक धोरणे आणि खंदे नेतृत्व एकत्र आल्याने काँग्रेस लोकांच्या हातात हात घालून देशाचा

इतिहास घडवितो.

काँग्रेस हा राष्ट्रीय पक्ष असून तोच स्थिरता देऊ शकतो अशी स्पष्ट ग्वाही काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी यांनी पक्षाचा जाहीरनामा प्रकाशित करताना दिली ती उगाच नव्हे. काँग्रेसने अगदी अचूकपणे दहशतवादाचे उच्चाटन, शेतकऱ्यांचे संरक्षण आणि धर्मनिरपेक्ष सरकार यांच्याविषयी स्पष्ट भूमिका मांडलेली आहे. ही धोरणे आखताना सामान्यातला सामान्य माणूस हाच काँग्रेसनी डोळ्यांपुढे ठेवलेला आहे. विकासदराचा वेग कायम ठेवताना प्रत्येकाला रोजगार कसा मिळेल याची काळजी घेतली आहे. त्याकरिता राष्ट्रीय कौशल्य विकास कार्यक्रम आखला आहे. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना आणखीन पुढच्या टप्प्यापर्यंत आणली आहे. प्रत्येकाला रोज १०० रुपये या दराने शंभर दिवसांचा रोजगार वर्षभरात किमान मिळावा म्हणून संकल्प केला आहे. विशेष म्हणजे काँग्रेसने त्याच्याच जोडीला राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा बनविण्याची घोषणा केली आहे. आगामी तीन वर्षांत दारिद्र्य रेषेखालील प्रत्येक कुटुंबाचा राष्ट्रीय आरोग्य विमा योजनेत समावेश करण्याची जबाबदारी घेतली आहे. कृषी व पायाभूत सेवा क्षेत्र आणि सामाजिक सुरक्षा या दोन्ही आघाड्यांवर शेतकऱ्यांचा आणि आर्थिकदृष्ट्या कमकुवत घटकांचा सहभाग महत्वाचा असेल असे ठासून सांगितले आहे. महिला, युवक, असंघटीत कामगार, अनुसूचित जाती-जमाती, दलित व आदिवासी विद्यार्थी इत्यादींच्या शिक्षणाकरिता अगदी जाणवण्यासारख्या सवलती दिलेल्या आहेत. हे सर्व करीत असताना लघु, मध्यम आणि मोठ्या उद्योगांच्या विकासात समतोल साधलेला आहे. काँग्रेसच्या जाहीरनाम्यातल्या या काही गोष्टी काँग्रेसच का देशाला स्थिर, समर्थ शासन देऊ शकेल याची साक्ष देते.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने तर याहीपुढे जाऊन आणखीन स्पष्ट व पुरोगामी धोरणे स्वीकारलेली आहेत. राष्ट्रवादीचा जाहीरनामा, राष्ट्रवादीचे नाशिकच्या कालिदास कला मंदिरातील चर्चासत्र आणि नाशिकच्याच गोल्फ क्लब मैदानावरील विराट सभा यातून समर्थ व पुरोगामी नेतृत्व देशाला देण्याची केवढी मोठी क्षमता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात आहे हे दिसून येते. दहशतवादाला धर्म, जात, पक्ष व प्रदेश नसतो अशी स्वच्छ भूमिका घेऊन महाराष्ट्राच्या संतांच्या भूमीत आपण व आपल्याच मित्र शक्ती दहशतवादी कृत्यांना पूर्ण आळा घालतील याची ग्वाही दिलेली आहे. आंतराष्ट्रीय स्तरावर आर्थिक मंदीचा दुष्परिणाम सर्वत्र झाला पण केंद्र शासनामध्ये श्री. शरद पवार हे कृषीमंत्री असल्याचा केवढा मोठा लाभ साऱ्या देशाला, सर्व लोकांना आणि विशेषतः शेतकऱ्यांना झाला ही गोष्ट आज तर सर्वमान्यच आहे. त्यांच्या चौफेर व दूरदर्शी धोरणांमुळे शेतीचा जो विकास झाला आणि शेतकऱ्यांना जे बळ लाभले त्यामुळेच देशाची आर्थिक व्यवस्था या महामंदीतही कोलमडली नाही. त्यांनी गहू, कापूस, तांदूळ, सोयाबीन, ज्वारी, बाजरी, डाळी व इतर पिकांना घसघशीत भाववाढ दिली. ते निर्णय क्रांतीकारी स्वरुपाचेच होते. त्यांच्या धोरणांमुळेच आपला शेतीविकासाचा दर वाढला, शेतीमालाची निर्यात वाढली आणि विक्रमी धान्योत्पादन होऊन देश अन्नधान्य उत्पादनात स्वयंपूर्ण झाला. शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्याचा धाडसी निर्णय राष्ट्रवादीच्याच पुढाकाराने झाला. अन्न सुरक्षा व शेतकऱ्यांचे हित साधत असतानाच बेरोजगार, युवक आणि महिला यांच्याविषयीही भरीव कामगिरी राष्ट्रवादीच्या नेत्यांनी करुन दाखविली. त्यांच्यामुळेच रोजगार हमी योजनेसाठी १६ हजार कोटींची तरतुद केली गेली. विशेष असे की समाजातील नानाविध गट व नानाविध हितसंबंध यांना सामावून घेऊन त्याचवेळी सुस्पष्ट, पुरोगामी आणि खंबीर धोरण घेण्याची क्षमता राष्ट्रवादीकडेच आहे हे वारंवार सिद्ध झालेले आहे. नाशिक येथे झालेली शरद पवार, आर.आर.पाटील, छगन भुजबळ, इत्यादींची भाषणे लक्षात घेतली तर या पक्षाच्या व्यापक भूमिकेची व आवाक्याची साक्ष पटते. हा पक्ष गोरगरीब, शेतकरी, शेतमजुर, बेरोजगार, बलुतेदार तसेच दलित, आदिवासी, भटके विमुक्त, अल्पसंख्यांक, इतर मागासवर्गीय, महिला यांचेही हित सतत जपत आलेला आहे. त्यांची आजवरची प्रत्यक्षातली कामगिरी आणि नवी धोरणे यातून हे स्पष्ट दिसते.

थोडक्यात पुढच्या १० वर्षात देशापुढे उभ्या राहणाऱ्या गंभीर समस्या लक्षात घेतल्यावर त्याबाबतची बिगर काँग्रेस पक्षांची नादान, भोंगळ आणि धरसोड लक्षात घेतल्यावर आणि दुसरीकडे काँग्रेस-राष्ट्रवादीची मोठी क्षमता जाणून घेतल्यावर आगामी लोकसभा निवडणुकीत सर्व मतदारांनी काँग्रेस-राष्ट्रवादी-रिपब्लिकन आघाडीला का भरभरुन साथ दिली पाहिजे हे कळून चुकते. खरोखरी देशाला अशी आघाडीच स्थिर, सक्षम व समर्थ नेतृत्व देऊ शकते हे मतदार जाणून असल्याने या निवडणुकीत या आघाडीला तो विजय रथावर आरुढ करुन निवडणुकीत घसघशीत जागा मिळवून देईन आणि ही आघाडीच देशाला प्रगतीच्या पुढच्या टप्प्यावर नेईन ही काळ्या दगडावरची रेघच आहे असे म्हटले तर ते योग्यच ठरेल.

डॉ. सुधीर भोंगळे



# धर्मांध व जातीयवाद्यांना रोखणे ही राष्ट्रीय गरज

**- शरद पवार**

"हातपाय तोडण्यासाठी राजकारणात जाण्याची ज्यांची भाषा आहे ते देशात ऐक्याचे वातावरण ठेवू शकणार नाहीत. राष्ट्रीय ऐक्याला सुरुंग लावण्याचे काम भारतीय जनता पक्ष करीत आहे. म्हणून त्यांना शंभर टक्के पराभूत करण्याचे काम आपण केले पाहिजे. या धर्मांध व जातीयवादी शक्ती आणि प्रवृत्ती रोखणे ही राष्ट्रीय गरज आहे आणि तसे घडले तरच समाजात आत्मविश्वासाचे वातावरण निर्माण होऊ शकेल."

लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने आपण सगळे आज येथे एकत्र जमलो आहोत. पाच वर्षांपूर्वी याच तारखेला या काँग्रेसभवन मध्ये आपण सगळे एकत्र झालो होतो. त्यावेळच्या निवडणुकीत जिल्ह्यात आपण संमिश्र विजय संपादन केला होता. या वेळेला मतदारसंघ बदलले आहेत. पुणे जिल्ह्यात जागा वाढल्या आहेत. महाराष्ट्रातून आपला व मित्र पक्षांचा प्रभाव देशाला दाखविण्यासाठी जबाबदारीने काम करण्याची जबाबदारी आपणा सर्वांवर येऊन पडली आहे. सगळ्यांचे उमेदवार विजयी करण्यासाठी आपल्याला शक्ती पणाला लावायची आहे. रिपब्लिकन पक्षाला बरोबर घेऊन जाण्याची निती काँग्रेस-राष्ट्रवादीने स्वीकारलेली आहे. राष्ट्रवादीने आपली अमरावतीची जागा त्यामुळे श्री. राजेंद्र गवई यांना दिलेली आहे.

श्री. रामदास आठवले यांना बरोबर घेतल्याशिवाय तर आमचे काम नीट चालतच नाही. इतकेच काय पण संसदही त्यांच्याशिवाय चालत नाही. संसदेत अतिशय कठिण प्रसंग निर्माण झाला आणि वातावरण तप्त झाले तर रामदास आठवले यांना बोलण्यासाठी आमंत्रित केले जाते आणि ते त्यांच्या भाषणाने सभागृहातील वातावरण पूर्णपणाने पालटून टाकतात. त्यामुळे सभागृह नीट चालविण्यासाठी देखील ते आम्हांला दिल्लीला हवे आहेत. ते कुठून उभे राहताहेत याबद्दलची शंका आम्हाला आहे. पण बाबासाहेबांचा विचार घेऊन ते पुढे जात असल्यामुळे आंबेडकर चळवळीचे ते ज्येष्ठ नेते आहेत. बौद्ध धर्माचा स्वीकार त्यांनी केलेला असला तरी सर्व धर्मांना प्रोत्साहित करणारा त्यांचा विचार हा पुरोगामी व प्रगतशील असाच आहे.

त्यांनी पहिली निवडणुक लढविली मुंबईच्या प्रभादेवी येथून. त्यावेळी त्यांनी नारायण आठवले यांचा पराभव केला. या मतदारसंघाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रभादेवीला सिद्धीविनायकाचे म्हणजे गणपतीचे मंदिर आहे. त्यावेळी गणेशच त्यांच्या पाठीशी उभा राहिला. त्यानंतर त्यांना आम्ही पंढरपुरला घेऊन गेलो. तेथे तर त्यांना पांडुरंगच पावला. १० वर्षे तेथून ते निवडून येत होते. आता त्यांच्या डोक्यात साईबाबांचे दर्शन घेण्याची इच्छा निर्माण झालेली दिसते आहे. त्यांना आशीर्वाद देण्यासाठी नेहमी कुणीतरी पाठीमागे उभा राहतो. या पार्श्वभूमीवर श्री. रामदास आठवले यावेळीही पुन्हा लोकसभेत येतील याविषयी माझ्या मनात शंका नाही.

दरवेळी मंत्रीमंडळ बनवताना माझ्यापुढे पेच उभा रहायचा. आठवले एनसीपीच्या कोट्यात आणि आम्हाला जागा मात्र तीनच. पण आता बरे झाले आठवले काँग्रेसच्या कोट्यात गेले. तिथेच राहा. राज्याच्या मंत्रीमंडळातही जागा त्यांच्याच कोट्यातून घ्या. म्हणजे मग शेगावकरांना अभय झाले. गंमतीचा भाग सोडून द्या. आठवले हे कायम स्पष्टपणाची भूमिका घेऊन



*पुण्याच्या काँग्रेस भवनात झालेल्या सभेत नारळ फोडून श्री. शरद पवार यांनी पुणे, बारामती व शिरूर या लोकसभा मतदारसंघातील काँग्रेस-राष्ट्रवादीच्या उमेदवारांच्या प्रचाराचा शुभारंभ केला. यावेळी व्यासपीठावर डावीकडून अभय छाजेड, जयवंत आवळे, माणिकराव ठाकरे, रामदास आठवले, मोहन प्रकाश, अशोक चव्हाण, सुरेश कलमाडी आणि सुप्रिया सुळे.*



*पुण्याच्या काँग्रेस भवनातील सभेत काँग्रेस-राष्ट्रवादी व रिपब्लिकन आघाडीच्या विजयाची ग्वाही देताना अभय छाजेड, जयवंत आवळे, मोहन प्रकाश, हर्षवर्धन पाटील, पतंगराव कदम, माणिकराव ठाकरे, रामदास आठवले, अशोक चव्हाण, शरद पवार, सुरेश कलमाडी, सुप्रिया सुळे आणि राजलक्ष्मी भोसले.*

काँग्रेस-राष्ट्रवादीच्या पाठीशी भक्कमपणाने उभे राहिलेले आहेत. त्यामुळे या लोकसभा निवडणुकीत आपण सारेजण त्यांच्या पाठीशी खंबीरपणाने उभे राहू आणि रिपब्लिकन पक्षाचे सर्व उमेदवार विजयी करण्यासाठी कार्यकर्ते मेहनत करतील असा शब्द तुमच्या सर्वांच्या वतीने मी त्यांना आज जाहीरपणाने देतो.

या निवडणुकीला आगळेवेगळे स्वरुप आहे. जगात मंदीचे प्रचंड संकट आहे. जगात महासत्ता म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अमेरिकेला मंदीच्या प्रचंड संकटाने ग्रासले आहे. अमेरिकेतही लाखो लोकांच्या नोकऱ्या गेल्या आहेत. दर पाच घरांपैकी एक घर तरी तिथे विकायला निघाले आहे. कर्जाने घेतलेल्या गाड्या बँकांनी ओढून नेल्या आहेत. हे चित्र अमेरिकेत सर्वत्र पहायला मिळते. मंदीचे हे दुष्परिणाम भारतावरही होणार आहेत. पुणे शहर हे ऑटोमोबाईल्सचे प्रमुख शहर बनले आहे. पूर्वी जिथे १०० टक्के उत्पादन होत होते ते आता २० ते ३० टक्क्यांवर आले आहे. अनेकांची रोजीरोटी धोक्यात आली आहे. अनेक कंपन्यांची उत्पादने घटली आहेत. उद्याची अर्थव्यवस्था सावरायची असेल तर भविष्याची दूरदृष्टी असणारे स्थिर सरकार केंद्रात असले पाहिजे. आम्हा सगळ्यांच्या सामुदायिक शक्तीतच ती कुवत आहे. त्यामुळे ज्यांच्यात कुवत व दृष्टी आहे त्यांच्या मागे आपली सारी शक्ती उभी करणे ही आपली जबाबदारी आहे.

या लोकसभा निवडणुकीत मुख्य लढाई एनडीए व युपीए यांच्यातच आहे. डॉ. मनमोहनसिंग यांच्या नेतृत्वाखाली युपीएमध्ये सहभागी झालेल्या सर्वच पक्षांनी एकत्रितपणे निवडणुक लढवावी अशी माझी इच्छा होती. ती मी जाहीरपणाने अनेकदा बोलूनही दाखविली होती. परंतु ती प्रत्यक्षात काही कारणांमुळे येऊ शकली नाही. असे असले तरीही ज्या दिवशी निवडणुका संपतील आणि सरकार बनविण्याची वेळ येईल तेव्हा युपीए मधील सर्व घटक पक्ष पुन्हा एकत्र बसतील आणि पुढची पाच वर्षे स्थिरता देणारे सरकार स्थापन होईल असा मला विश्वास आहे. या दृष्टीने युपीए मध्ये सहभागी झालेले पक्ष व त्यांचे उमेदवार लोक मोठ्या प्रमाणावर निवडून देतील असा मला विश्वास आहे. आपला सगळ्यांचा संघर्ष एनडीएशी आहे. पंतप्रधान पदाचे उमेदवार म्हणून अडवाणींना प्रोजेक्ट करण्याची भूमिका एनडीएने घेतली आहे. काँग्रेसनेही जाहीरनामा प्रसिद्ध करताना डॉ. मनमोहनसिंग यांना पंतप्रधान पदाचे उमेदवार

# पुण्याच्या काँग्रेसभवनातील सभेची छायाचित्रे




मा. ना. अशोक चव्हाण
काँग्रेस भवन, शिवाजीनगर, पुणे - ५



*काँग्रेस भवनातील सभेत व्यासपीठावर बसलेले असतानाच श्री. शरद पवार यांनी आपल्या हातातील घड्याळ काढून त्याला मुख्यमंत्री अशोक चव्हाण व खासदार सुरेश कलमाडी यांच्या उपस्थितीत चावी दिली हा क्षण फोटोग्राफरच्या चाणाक्ष नजरेतून काही सुटला नाही.*

म्हणून प्रोजेक्ट केलेले आहे. पंतप्रधान पदासाठी कुणी कुणाला प्रोजेक्ट करावे हा ज्या त्या पक्षाचा व्यक्तीगत प्रश्न आहे. एनडीएने लालकृष्ण अडवानी यांना प्रोजेक्ट करण्याची जी भूमिका घेतली तो त्यांचा व्यक्तीगत प्रश्न असला तरीही पंतप्रधान निवडताना त्या पक्षाची धोरणे आणि राष्ट्रीय गरज बघितली पाहिजे. सर्व माणसामाणसांत, जातीजातीत व धर्माधर्मांत एकोपा, एकसंघपणा टिकवू शकेल व अशी कुवत ज्यांच्यामध्ये असेल अशाच लोकांच्या हातात देशाची सत्ता गेली पाहिजे. ही कुवत अडवाणी व त्यांच्या माणसांच्या मध्ये आहे असे काही दिसत नाही.

गुजरात हायकोर्टाने काय सांगितले? उच्च शिक्षण व महिला व बालकल्याण मंत्री मायाबेन कोडनानी यांचा जामीन कोर्टाने का रद्द केला? अहमदाबादमधील नरोडा पटिया व नरोडा ग्राम या वस्तीत उफाळलेल्या मुस्लीमविरोधी दंगलीत १०६ लोक ठार झाले होते. त्या १०६ लोकांच्या हत्येला जबाबदार असल्याबद्दल संबंधित मंत्र्यांना अटक करण्याची भूमिका घ्यावी लागली. शेकडो लोकांचे बळी घेणारे नेते गुजरात सरकारच्या मंत्रिमंडळात आहेत आणि शेकडो लोकांच्या हत्येला जबाबदार असणारे लोक जेव्हा मंत्रिमंडळात बसतात तेव्हा सामाजिक ऐक्याच्या बाबतीत हे सरकार काय भूमिका घेणार? ६८ वर्षाच्या एका माजी मुस्लीम काँग्रेस खासदाराला अहमदाबादमध्ये जिवंत जाळण्यात आले. त्यांना कुणीही संरक्षण दिले नाही आणि गुजरातमध्ये घडलेल्या जातीय दंगली व गोध्रा हत्याकांड याची उदाहरणे आपल्या समोर आहेत. असे हत्याकांड घडवून आणणारे लोक उद्याचा देश चालवायचा अधिकार मागतायेत. किती उदाहरणे देऊ.

कसली तरुण पिढी व विचारधारा आपण जनतेच्या समोर आणतो आहे. वरुण गांधींची हात तोडण्याची भाषा किती कडवी व टोकाची आहे. सुरुवातीला दोन दिवस त्यांच्या पाठिशी उभे राहण्याची भूमिका भाजपने घेतली नाही पण नंतर मात्र लगेचच राजनाथ सिंह यांनी वरुणच्या भूमिकेला पाठिंबा दिला आणि आता भाजपही वरुणच्याच पाठिशी उभा आहे. हातपाय तोडण्यासाठी राजकारणात जाण्याची ज्यांची भाषा आहे ते देशात ऐक्याचे वातावरण ठेवू शकणार नाहीत. राष्ट्रीय ऐक्याला सुरुंग लावण्याचे काम भारतीय जनता पक्ष करीत

आहे. म्हणून त्यांना शंभर टक्के पराभूत करण्याचे काम आपण केले पाहिजे. या धर्मांध व जातीयवादी शक्ती आणि प्रवृत्ती रोखणे ही राष्ट्रीय गरज आहे आणि तसे घडले तरच समाजात आत्मविश्वासाचे व निर्भयतेचे वातावरण निर्माण होऊ शकेल.

डॉ. मनमोहनसिंग यांच्या नेतृत्वाखाली पाच वर्षाचा कारभार झाला देशात. १८ पक्षांचा पाठिंबा घेऊन त्यांनी सरकार चालविले. पण मी आवर्जून व अतिशय प्रामाणिकपणे आपल्याला सांगू इच्छितो की, मंत्रिमंडळात मतभेद झाले किंवा कुणाला विश्वासात घेतले नाही असा एकही प्रसंग आला नाही. पंतप्रधानपदाची जबाबदारी डॉ. मनमोहनसिंग यांनी समर्थपणे सांभाळून देशाच्या विकासाला प्रचंड गती दिली. तीच गती आपल्याला यापुढेही कायम ठेवायची आहे. ६ ते ८.५ टक्क्यांपर्यंत कधीही विकासाचा दर गेलेला नव्हता. काल अमेरिकेचे राष्ट्रपती बराक ओबामा यांचे भाषण आपण सर्वांनी दूरदर्शनवर पाहिले असेल. अमेरिकेच्या राष्ट्रपतीला भारताच्या विकासाची आता चिंता वाटू लागली आहे. असाच विकासाचा वेग कायम राहिला तर येत्या ५-१० वर्षांत भारत आणि चीन हे आर्थिक प्रगतीत अमेरिकेच्या पुढे जातील अशी भीती त्यांना वाटू लागली आहे.



*निवडणुकीतील डावपेचांचे मार्गदर्शन तर श्री. शरद पवार यांच्याकडून हर्षवर्धन पाटील घेत नसतील ना?*

गेल्या ५ वर्षांत युपीए सरकारने जे प्रचंड विकासाचे काम केले ते लक्षात घेऊन याच प्रवृत्तीला खऱ्या अर्थाने सत्ता देण्याचे काम आपण केले पाहिजे. हा देश ७० टक्के खेड्यात राहणाऱ्या, ६२ टक्के शेतीवर अवलंबून असलेल्या आणि ८२ टक्के अल्पभूधारक असलेल्या शेतकऱ्यांचा देश आहे. आजपर्यंत त्यांचे ७१ हजार कोटी रुपयांचे कर्ज कोणी माफ केले होते? स्वातंत्र्यानंतर या देशात हे कधीही घडले नव्हते. युपीए सरकारने पहिल्यांदा साडेचार कोटी शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली. महाराष्ट्र सरकारनेही स्वतःच्या तिजोरीतून ६ हजार कोटींची जबाबदारी उचलली. त्यामुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना जवळपास १४ हजार कोटींची कर्जमाफी मिळालेली आहे.



*निवडणुकीत काँग्रेस-राष्ट्रवादीची आघाडी झाल्यामुळे काँग्रेसमधील काही नेत्यांच्या पोटात बरेच दुखले. त्याविषयी मुख्यमंत्री अशोक चव्हाण हे श्री. शरद पवार यांना माहिती देत असावेत, अशी शंका त्यावेळी अनेकांना आली.*

७० टक्के धान्य अजूनही गोदामात पडून आहे. माझ्यापुढे चिंता आहे या धान्याची विल्हेवाट कशी लावायची. गोदामात धान्य ठेवायला जागा नाही आणि १ एप्रिल पासून नवीन गहू खरेदी करावा लागणार आहे. तो ठेवायचा कुठे? असा प्रश्न माझ्यापुढे आहे. शेतकऱ्यांमधला आत्मविश्वास जागृत करण्याची भूमिका घेतल्यामुळेच विक्रमी धान्य उत्पादन झाले आहे. वाजपेयींच्या काळात गव्हाला भाव ६३० रुपये




*खासदार रामदास आठवले यांचे गंमतीदार पण मार्मिक भाषण ऐकताना व्यासपीठावरील नेत्यांनाही हसू आवरत नव्हते. अशाच एका क्षणी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी तर कपाळाला हात लावून आठवलेंना दाद दिली.*

होता. आम्ही १०८० रुपये भाव दिला. त्यांच्या वेळी कापसाचा दर १८०० रुपये क्विंटल होता. आम्ही २८०० रुपये दर दिला. हे दर वाढवून दिल्यामुळे ग्रामीण भागातील सामान्य माणसाच्या हातात आज पैसा खेळताना दिसतो आहे. तुलनेने खेड्यापाड्यातील माणसाच्या हातात पहिल्यांदा पैसा गेला आहे. हे काम आमच्या सरकारने केले आहे. महाराष्ट्राप्रमाणेच केंद्रातही रोजगार हमीचा कायदा केला. २० हजार कोटींची तरतुद केली. कमीत कमी १०० दिवसांचा रोजगार दिला. यापूर्वी कधीही हे काम झाले नव्हते.

शहरांसाठी किती पैसे खर्च केले ? जेएनयूआरएम योजनेसाठी २५ हजार कोटी रुपये दिले. १४०० कोटी रुपये पुण्याला मिळाले आणि आणखीन साडेतीन हजार कोटींचे प्रस्ताव मंजूर केले आहेत. २००० कोटी रुपये पिंपरी-चिंचवडला मिळाले. तेथील रस्ते जाऊन बघा. पिंपरी-चिंचवड शहराचा आज पूर्ण कायापालट झालेला आहे. काम करण्यासंबंधीची दृष्टी असलेल्या व परिवर्तन करु इच्छिणाऱ्या आमच्या सरकारच्या पाठीशी उभं रहायचे की माणसांची हत्या करणाऱ्या विषवल्ली वाढवायच्या याचा निर्णय तुम्हाला करावा लागणार आहे.

सामान्य माणूस समोर ठेवून त्याच्या हिताचे निर्णय आम्ही सातत्याने करीत आलो आहोत. पण तिकीट देतांना सर्वांना उमेदवारी देणे शक्य नव्हते. जागा कमी आणि मागणाऱ्यांची संख्या प्रचंड. त्यामुळे तिकीट कुणाला द्यायचे हा निर्णय करताना नेतृत्वावर दबाव येत होता. असं असतानाही **आता काही लोक स्वतंत्र निवडणुका लढविल्या असत्या तर बरे झाले असते असे बोलत आहेत. राज्य आणि देश चालवायचा असेल तर सामंजस्य ठेवायचे असते. हे सूत्र गेली १० वर्षे महाराष्ट्र चालवित असताना आपण सांभाळले आहे. आज जे म्हणतात की एकट्याने निवडणुक लढवायला पाहिजे त्यांनी सरकारसुद्धा एकट्याने चालवायची भूमिका त्यावेळी घेऊन का पार पाडली नाही ? आता हे बोलणे बरे नव्हे !**

खूप वेळा संघर्ष झाले पण मूळ विचारधारा बदललेली नाही. अजूनही आम्ही मूळ विचारधारेतच आहोत. **जिथे जिथे काँग्रेस रिपब्लिकन पक्षाचा उमेदवार असेल तिथे तिथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी त्यांचे काम केले पाहिजे हे माझे आग्रही सांगणे आहे. जे या पद्धतीने काम करतील त्यांनाच पक्षात स्थान आहे. बाकीच्यांना स्थान नाही.** आपल्याला एका नव्या संग्रामाला सामोरे जायचे आहे. उद्या माझे काय होणार याची ज्यांना चिंता पडलेली आहे त्यांना त्यांचा लखलाभ होवो. आपण काँग्रेस-राष्ट्रवादी व रिपब्लिकनचे सर्व उमेदवार आणि राज्यातील सर्वच्या सर्व म्हणजे ४८ जागा जिंकू इच्छितो असे यश मिळवून महाराष्ट्र आपण मजबुतीने देशाच्या पाठीशी उभा करण्याच्या कामाला आता लागूया.

# यावेळी झालेली इतर मान्यवर नेत्यांची भाषणे पुढीलप्रमाणे

## जातीयवाद्यांचा डाव हाणून पाडा : अशोक चव्हाण




पवार साहेबांची आजच्या सभेला असणारी उपस्थिती म्हणजे चांगल्या मताधिक्याने सर्व उमेदवार विजयी होणार याची ही खूण आहे. सुरेश कलमाडी यांनी प्रचंड काम पुणे शहरासाठी केलेले आहेत. आपण विजयी होऊ असा त्यांना प्रचंड आत्मविश्वास त्यामुळेच आहे. या शहरात विकासाचे खूप चांगले काम झाले पाहिजे आणि झोपडपट्टीवासियांची कामे झाली पाहिजेत अशी आग्रही भूमिका सातत्याने कलमाडी मांडत आले आहेत. देशाचे चित्र स्थिर आहे. पवार साहेबांनी प्रतिसाद दिल्यामुळेच युती होऊ शकली आहे. अन्यथा सेक्युलर मतांचे विभाजन झाले असते. आपल्यात बेबनाव झाला तर धर्मांध व जातीय शक्तींना ताकद मिळेल. हे लक्षात घेऊन सोनिया गांधी, राहुल गांधी व पवार साहेबांनी एकोप्याने निवडणुकांना सामोरे जाण्याचा विचार केला. एकत्र येण्याची भूमिका त्यांनी मनापासून स्वीकारली. कार्यकर्त्यांचे प्रश्न असंख्य आहेत. राष्ट्रवादीला जिथे तिकीट मिळाले तिथे काँग्रेसच्या कार्यकर्त्याला आपले भविष्य अंधःकारमय आहे असे वाटते. जिथे काँग्रेसच्या उमेदवाराला तिकीट मिळाले तिथे राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांची भावना अशाच प्रकारची आहे. निवडणुकीनंतर या सर्व कार्यकर्त्यांना एकत्र घेऊन आपल्याला बसावे लागेल. आपला कार्यकर्ता जिवंत राहिला पाहिजे. त्याच्याशिवाय पक्षाला ताकद मिळणार नाही. सामंजस्याने व एकोप्याने पावले टाकून ही निवडणुक आपल्याला लढवायची आहे व स्थिर सरकार देण्यासाठी काँग्रेस-राष्ट्रवादी-रिपब्लिकनचे सर्व उमेदवार विजयी करायचे आहेत.

पुणे शहराला १५०० कोटी रुपये जेएनयूआरएम मधून मिळाले. भाजपच्या काळात काहीही मिळाले नसते. गेल्या चार वर्षात सर्वांत जास्त उद्योग पुणे शहरात आले. महाराष्ट्रात जेवढी गुंतवणूक झाली त्यातील ८० टक्के पुण्यात झाली. १ लाख, ५१ हजार कोटींपेक्षा जास्त गुंतवणूक गेल्या सहा महिन्यात महाराष्ट्रात झाली आहे. 'सबसे बडा खिलाडी सुरेश कलमाडी' अशी आपली घोषणा आहे. सोशल इंजिनिअरींगची गरज आजच का पडावी ? इतर लोकांचा विचारच कधी केला नाही. जातीयतेचे विष पेरायचेच काम त्यांना करायचे आहे. दलित, मुस्लिम, अल्पसंख्यांकांच्या बाजूच्या भूमिका घेतल्या असे दाखवून प्रत्यक्षात वेगळे काही त्यांना साधावयाचे आहे. पण त्यांचा हा डाव आमचे कार्यकर्ते व जनता हाणून पाडल्याशिवाय राहणार नाही.

सगळ्यांना बरोबर घेऊन जाण्याचे काम गेल्या ५० वर्षांपासून काँग्रेस-राष्ट्रवादी करीत आली आहे. भविष्यातही सामान्य माणसांच्या मनात विश्वास निर्माण करुन हे राज्य कायद्याचे व गरीबांसाठी चालणारे आहे असे चित्र निर्माण करु. मध्यंतरी मुंबईमध्ये झालेल्या बॉम्बस्फोटांमुळे सामान्य माणसाच्या विश्वासाला तडा गेला म्हणून केंद्रीय नेतृत्वाला राज्याच्या नेतृत्वात परिवर्तन करावे लागले. २६ नोव्हेंबरला मुंबईत जे घडले ते पुन्हा कधी घडणार नाही आणि घडविण्याचा कुणी

प्रयत्नच केला तर त्यांना ठोकून काढू असा विश्वास व दिलासा देण्यासाठी नेत्यांनी आम्हांला पाठविले आहे. केंद्रात मजबुत व स्थिर सरकार असेल तरच राज्यातील सरकारही टिकेल. या दृष्टीने विचार करुन आपण कॉंग्रेस-राष्ट्रवादी-रिपब्लिकनचे सर्व उमेदवार विजयी करा एवढेच कळकळीने विनवितो.

## सेना-भाजपचा सत्यानाश करायचाय : आठवले

आता मी राष्ट्रवादी भवनातून कॉंग्रेस भवनात आलो आहे ठाकऱ्यांना चोख उत्तर देण्यासाठी. मी पुण्यनगरीत आलो आहे. फुले, आंबेडकर, छत्रपती शिवरायांचे दर्शन घेण्यासाठी आणि मी दिल्लीला जात आहे सर्वधर्मसमभावाचे गीत गाण्यासाठी. माझ्या पाठिंब्यामुळे सगळ्यांचे धाबे दणाणताहेत. कमळ कुठे जात आहे हे तर समजतच नाही. हत्ती कुठे गाडला जाईल हे कळणारच नाही. कारण पवारांच्या पायाने चालून पावन झालेली ही माती आहे. आज कलमाडी खूप खुष आहेत. कारण शरद पवार सभेला आलेले आहेत. कलमाडी तुम्ही काही चिंता करु नका. अजितदादा सभेला आलेले नसले तरी पवार साहेब तुमच्या बरोबर आहेत. आम्ही सगळे देशावर आणि देशाच्या मातीवर प्रेम करणारे आहोत. म. गांधींचा खून या जातीयवाद्यांनी केलेला आहे. अशा लोकांना बाबासाहेबांचे विधान मान्य आहे का ? हे आधी विचारा आणि तसे मान्य असेल तर भाजपवाल्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला बाजूला करावे.




कॉंग्रेसमुळे या देशाला स्वातंत्र्य मिळाले. हाफ चड्डी घालणारे स्वातंत्र्यासाठी कधी लढले नाहीत. स्वातंत्र्य मिळाले नसते तर अडवाणी तिकडे सिंध प्रांतातच राहिले असते. अडवाणी कधीच पंतप्रधान बनू शकत नाहीत. आता पुन्हा मनमोहनसिंगच पंतप्रधान बनणार आहेत. लेकिन मेरा क्या होगा? मी कधी मंत्री होणार. मी तसाच राहिलो. हरकत नाही. आम्ही आता आकडे वाढविणार आहे. तुम्ही त्या आकड्यांत अडकणार आहात. सेना भाजपचा सत्यानाश मला करायचाय. त्यासाठी मी दिल्लीला जातो आहे. बाळ ठाकरेंचे हिंदुत्व शिवाजी महाराजांना बदनाम करणारे आहे. ही शिवसेना गाडायची आहे. मात्र कलमाडींना माझे सांगणे आहे. आमच्या पुण्यातील झोपडपट्टीवाल्यांना ५०० फुटांचे घर मिळालेच पाहिजे.

हत्तीचे चिन्ह घेऊन हा बिल्डर डीएसके कशाला उभा राहिला आहे? बिल्डिंग बांधायचे काम करायचे सोडून डीएसके हे दुसऱ्या धंद्यात कशाला पडले? एवढे पैसे कशाला खर्च करता?' असे मी विचारले तर ते म्हणतात, 'निवडणुकीत सगळ्या पक्षाचे लोक मलाच पैसे मागायला येतात त्यापेक्षा मीच उभा राहतो आणि सगळ्यांकडून पैसे गोळा करतो.' या हत्तीला महाराष्ट्रात काडीचेही स्थान मिळणार नाही आणि मायावतीचा हत्ती महाराष्ट्रात झोपविला जाईल हे आवर्जून मी सांगू इच्छितो. आमच्या रिपब्लिकनच्या पाठिंब्यावर कॉंग्रेस-राष्ट्रवादीचे सगळे उमेदवार विजयी होतील पण निवडून आल्यानंतर आम्हाला विसरु नका.

## अफवांवर विश्वास ठेवू नका : माणिकराव ठाकरे

कॉंग्रेसने सुरुवातीपासूनच सर्व धर्मनिरपेक्ष शक्तींनी एकत्र आले पाहिजे आणि निवडणुकीला एकोप्याने सामोरे गेले पाहिजे अशी अपेक्षा बाळगली होती. त्याला पवार साहेबांच्या पाठिंब्यामुळे यश मिळाले आहे. त्यामुळे चांगले चित्र महाराष्ट्रात उभे राहिले आहे. ४८ जागा महाराष्ट्रात आहेत. या सर्व उमेदवारांच्या पाठिशी दोन्ही कॉंग्रेसच्या नेत्यांची ताकद उभी आहे. काही लोक अपप्रचार करीत आहेत की राष्ट्रवादीवाले कॉंग्रेसचे काम करीत नाही आणि कॉंग्रेसवाले राष्ट्रवादीचे काम करीत नाहीत.



अशा तक्रारी केल्या जात आहेत. कार्यकर्त्यांनी सतर्क राहिले पाहिजे. अफवांवर विश्वास ठेवू नका. सर्व नेते एकत्र आले आहेत. कोणती जागा कोणाला मिळते याची सुरुवातीला उत्सुकता होती पण आता जागा वाटप झालेले आहे. धर्म निरपेक्ष शक्तींनी जातीयवादी शक्तींना सडेतोड उत्तर दिले पाहिजे. महाराष्ट्राकडून देशाला फार अपेक्षा आहेत.

## पवारांनीच मला राजकारणात आणले : सुरेश कलमाडी

हातात घड्याळ घातले आहे. घड्याळाला निळ्या रंगाचा पट्टा आहे. हे कॉकटेल फारच भयानक आहे. जय हो ! पुण्यात चार सीट आहेत. जय निश्चित आहे. देशात युपीए सरकार येणार आहे. निवडणुकीचे नोटीफिकेशन निघाल्याबरोबर राहुल गांधी कॉंग्रेस भवनात येऊन गेले. शरद पवारांनी मला राजकारणात आणले हे मी कधीही विसरु शकणार नाही. मी पायलट होतो. त्यांचे मार्गदर्शन मिळाले म्हणूनच राजकारणात यशस्वी झालो.




सुरुवातीला आयटीसाठी सिंगल विंडो सिस्टीम करा हे मार्गदर्शन शरद पवारांनीच आम्हाला केले. त्यामुळेच पुण्याच्या आयटीची निर्यात २५ हजार कोटींवर गेली आहे. २०२० साली आपण ऑलिम्पिक स्पर्धा पुण्यात आणण्याचा विचार करतो आहे. शरद पवार कॉमनवेल्थ गेम चे पेट्रन आहेत. कॉमनवेल्थ गेमसाठी २५०० कोटी रुपये पवार साहेबांमुळे आले. क्रिडा आणि विकास हातात हात घालूनच चालतात. सध्या पुणे शहरात वाहतुकीची मोठी समस्या आहे. पब्लिक ट्रान्सपोर्ट सुधारायचे आहे. त्यासाठी मेट्रोचे नियोजन करता येईल. फ्लाय ओव्हर्स बांधता येतील. इंटरनॅशनल एअरपोर्ट करायच आहे. झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांना ३५० चौ. फुटाची पक्की घरे दिल्याशिवाय मी राहणार नाही. पुण्यात राजीव गांधी युवक बचत गट स्थापन करुन मुख्यमंत्र्यांनी पुणे शहरातील महिला बचत गटांना ४ टक्के दराने कर्ज देण्याचे काम केले पाहिजे.

## आयुष्याच्या नवीन वळणार मी उभी : सुप्रिया सुळे

माझ्या दृष्टीने आजचा दिवस अत्यंत महत्वाचा आहे. गेली साडेतीन महिने बारामती लोकसभा मतदार संघाचा मी दौरा करते आहे. पहिल्यांदाच मी निवडणुक लढविते आहे. मतदारसंघातील लोकांचे प्रश्न समजावून घेणे व ते सोडविण्यासाठी पाठपुरावा करणे हे खासदारांचे काम आहे. गेल्या तीन वर्षात राज्यसभेत खासदार म्हणून काम करताना महाराष्ट्राच्या प्रत्येक तालुक्यात जाण्याचा मला योग आला. पाणी, कुपोषण, महिला, युवा पिढीचे शिक्षण, नोकऱ्या यांसारख्या अनेक प्रश्नांवर चर्चा झाली. या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी पाठपुरावा करताना पवार साहेबांचे मार्गदर्शन मिळाले. देशात बारामती लोकसभा मतदार संघाचा वेगळा मान आहे. शरद पवार साहेबांचा हा मतदारसंघ असल्यामुळे आणि गेली ४० वर्षे त्यांनी सतत काम करुन हा भाग विकसीत केलेला असल्यामुळे देशातील सर्वांचे त्याच्याकडे विशेष लक्ष आहे. आता भोर, वेल्हे, मुळशी, खडकवासल्याचा काही भाग नव्याने बारामती मतदारसंघाला जोडला गेला आहे. युपीएच्या माध्यमातून स्थिर सरकार देशाला मिळाले. अजितदादांच्या माध्यमातून पुणे शहरातील पाणी, रस्ते यांसारखी बरीच कामे होऊ शकली आहेत. महिला बचत गट, पुढच्या पिढीचे शिक्षण यात चांगला बदल आपल्याला भविष्यात घडवून आणायचा आहे. शरद पवारांनी म्हणजे एका शेतकऱ्याच्या मुलाने ४० वर्षांपूर्वी पुणे शहर व जिल्ह्याचे विकासाचे जे स्वप्न



बघितले होते ते आता पूर्ण होत आहे याचे मला समाधान आहे. मी मात्र माझ्या आयुष्याच्या नवीन वळणावर उभी आहे. त्यात यशस्वी होण्यासाठी तुम्ही सर्वांनी मला आशीर्वाद द्यावा.

## भाजपवाले उद्या कसाबलाही सोडतील : गोविंदराव आदिक

राष्ट्रवादी काय, राष्ट्रीय काय, काँग्रेसच शेवटी. सगळ्यांचा उर आज अभिमानाने भरुन आलेला आहे. सर्व नेत्यांचे मनोमिलन पाहण्यासाठी आपण येथे जमलो आहोत. या मनोमिलनाबद्दल मी दोन्ही काँग्रेसच्या राष्ट्रीय नेतृत्वाला धन्यवाद देतो. आपल्यापेक्षाही देश आणि समाज मोठा आहे. हे या नेत्यांनी जाणले म्हणूनच हे मनोमिलन होऊ शकले आहे. देशापुढे आव्हाने मोठी आहेत. जातीय व धर्मांध शक्ती वाढत आहेत. त्यांचा मुकाबला करण्यासाठी आणि या पाखंडी लोकांना गाडण्यासाठी आपण एकत्र आलो आहोत. डॉ. आंबेडकरांनी घटना लिहून दिली त्याला ६० वर्षांहून अधिक काळ होऊन गेला. आपल्या शेजारच्या आजूबाजूच्या देशात लोकशाही टिकली नाही पण आपण मात्र हा देश लोकशाहीच्या मार्गाने पुढे घेऊन जात आहोत. प्रश्न अनंत असताना जनतेने जाणतेपणाने लोकशाही जिवंत ठेवली आहे. सर्वसामान्य माणसाची प्रगती व आत्मविश्वास जपण्याचे काम नेतृत्वाने केले आहे. समाजाचे विघटन करणाऱ्या शक्ती धर्म, जाती, प्रांताच्या नावाखाली पुढे निघाल्या आहेत. स्वतःच्या स्वार्थासाठी देश तुटला तरी चालेल असा यांचा घातकी विचार आहे. देशाच्या विघटनाचा प्रश्न सर्वात मोठा आहे. तेच मोठे आव्हान आहे. राजकीय स्थैर्य देण्याबरोबरच देशाचे संरक्षण, सामाजिक अभिसरण, सर्वधर्मसमभावाचे तत्व आणि सुस्थिर शासन देण्याची ताकद फक्त युपीएमध्येच आहे. जातीयवादी व धर्मवाद्यांचा अडवाणी हा म्होरक्या आहे. अडवाणी गृहमंत्री होते तेव्हा देश सर्वांत जास्त कमकुवत बनला होता आणि तीच माणसे आज सत्ता मागत आहेत. संसदेवर हल्ला करणाऱ्यांचा नेता अझहर मसूद याला जसवंतसिंह स्वतःच्या विमानातून घेऊन सोडण्यासाठी गेले. आता कदाचित मुंबईवर बॉम्बहल्ला करणाऱ्या अजमल कसाबलाही नेऊन सोडतील. पवार साहेबांसारखा नेता या देशात मजबुतीने उभा आहे. श्री. सोनिया गांधी आणि श्री. शरद पवार ही नेतृत्वाची जोडी कायम टिकावी व त्यांच्या पाठिशी ताकद व आशीर्वाद आपण सर्वांनी उभे करावेत.

यावेळी अखिल भारतीय काँग्रेस समितीचे सचिव मोहन प्रकाश, जयवंतराव आवळे, महापौर राजलक्ष्मी भोसले, पुणे शहर काँग्रेसचे अध्यक्ष अभय छाजेड, राष्ट्रवादीचे अध्यक्ष जयदेव



गायकवाड यांची भाषणे झाली. काँग्रेस-राष्ट्रवादी व रिपब्लिकन आघाडीच्या उमेदवारांचा प्रचाराचा नारळ काँग्रेस भवनामध्ये श्री. शरद पवार यांच्या हस्ते फोडण्यात आला. सभेला दिलीप वळसे पाटील, डॉ. पतंगराव कदम, हर्षवर्धन पाटील हे मंत्री तसेच शंकरराव जगताप, अनंतराव थोपटे, विलासराव पाटील, चंद्रकांत छाजेड, विलास लांडे हे आमदार व मान्यवर उपस्थित होते.

●●●

- दिनकर तावडे

*चिटणीस, राष्ट्रवादी काँग्रेस*


# गुजरात उच्च न्यायालयाची मोदी सरकारला चपराक



**गोध्रा हत्याकांडानंतर २००२ साली गुजरातेत जे भीषण जातीय दंगे झाले, त्याची झळ नरोदा पतिया व नरोदा गांव परिसरास मोठ्या प्रमाणात लागली होती. शंभरहून अधिक निरपराध अल्पसंख्यांकांचे जीव घेणाऱ्या त्या दंग्यांचे नेतृत्व गुजरातच्या एक राज्यमंत्री माया कोदनानी यांच्याकडे होते. त्यांचा अटकपूर्व जामीन रद्द करुन गुजरात उच्च न्यायालयाने नुकतीच धर्मांध मोदी सरकारला जबर चपराक दिली आहे. अर्थात या निकालानंतर कोदनानी बाईंनी मंत्रीपदाचा राजीनामा दिला असला तरी भाजपच्या नेत्यांनी मात्र हा मोदी सरकारला बदनाम करण्याचा कट असल्याची मतलबी ओरड सुरु केली आहे.**

गोध्रा हत्याकांडानंतर २००२ साली गुजरातेत जातीय दंग्यांचा जो वणवा पेटला, त्याची झळ नरोदा पतिया व नरोदा गाव परिसरास मोठ्या प्रमाणात लागली होती. तेथील दंग्याचे नेतृत्व सध्या नरेंद्र मोदी मंत्रिमंदळाच्या सदस्य असलेल्या माया कोदनानी यांच्याकडे होते. हे नेतृत्व करताना त्यांनी दंगेखोरांना अल्पसंख्यांकांवर हल्ले करण्याची चिथावणी तर दिलीच परंतु तलवारींसारखी घातक शस्त्रेही वाटली आणि ते कमी म्हणून की काय, स्वतःच्या पिस्तुलातून गोळीबारही केला. अर्थात पुढे सुरत पोलिसांनी या प्रकरणाचा तपास केला आणि कोदनानींवर कोणतेही आरोप ठेवण्याइतका सबळ पुरावा नसल्याचे जाहीर करुन त्यांना निर्दोष सोडून दिले. कोदनानींनी पेटविलेल्या भीषण दंग्यात सुमारे शंभर नागरिक प्राणांस मुकले असतांना राज्य सरकारच्या पोलिसांनी पुरावे नसल्याचे सांगून, हे प्रकरण दडपावे यापरते धक्कादायक व निषेधार्ह काही असूच शकत नव्हते. अखेर काही बिगर सरकारी संघटना व प्रतिष्ठित नागरिकांनी या प्रकरणाचा जिद्दीने पाठपुरावा केला आणि सर्वोच्च न्यायालयात धाव घेऊन संशयित आरोपींवर गुजराथ उच्च न्यायालयात खटला दाखल करणे राज्य सरकारला भाग पाडले. अनेकदृष्ट्या ऐतिहासिक मानाव्या अशा या खटल्याचा निकाल न्यायमूर्ती डी. एच. वाघेला यांनी नुकताच दिला आणि श्रीमती कोदनानी व त्यांच्या अन्य साथीदारांना सत्र न्यायालयाने मंजुर केलेला अटकपूर्व जामीन रद्दबादल ठरविला. हे सर्व प्रकरण मोदी सरकार व भाजपला बदनाम करण्यासाठी शिजविले गेले असल्याचा कांगावा आजवर केला जात होता आणि सर्व संकेत धाब्यावर बसवून कोदनानींबाईंच मंत्रीपदही सुरक्षित राखले गेले होते. परंतु आता उच्च न्यायालयाची चपराक बसल्यानंतर मात्र त्यांना राजीनामा देणे भागच पडले आहे. कोदनानी-मोदी व भाजप या सर्वांचे खरे स्वरुप उजेडात आणणाऱ्या संबंधित निकालपत्राचा संक्षिप्त स्वैर अनुवाद 'राष्ट्रवादी' च्या जिज्ञासू-जाणकार वाचकांसाठी येथे मुद्दाम प्रसिद्ध करीत आहोत.

## गुजरात उच्च न्यायालयाने २७ मार्च २००९ रोजी दिलेल्या निकालपत्रातील काही महत्त्वाचे मुद्दे पुढीलप्रमाणे :

१) नरोदा पातिया व नरोदा गाव येथील दंग्यात १०६ जण मारले गेले. अनेक जण जखमी झाले व तीन जण बेपत्ता झाले (जे आता मृत म्हणून घोषित केले गेले आहेत.) या दंग्या-संदर्भातील दोन गुन्हेगारी खटल्यांशी संबंधित दोन व्यक्तींना आहमदाबाद सत्र न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजुर केला होता. त्यापैकी एक श्रीमती माया कोदनानी यांच्यावर दाखल केलेला गुन्हा केवळ त्या दंगेखोरांच्या जमावात होत्या हे सुचित करणाऱ्या निवदेनाआधारे आहे तसेच आपल्याविरुद्धचे पुरावे नष्ट करण्यासाठी प्रयत्न केल्याचा आरोपही त्यांच्यावर नाही, या दोन गोष्टींची नोंद घेऊन हे अटकपूर्व जामीनाचे आदेश देण्यात आले होते. त्यांच्याविरुद्धचे खटले 'नरोदा पातिया' व 'नरोदा गांव' खटले म्हणून कुप्रसिद्ध असून, त्यांचे पंजीकरण सी.आर. नं. १०० व सी. आर. नं. ९८ (२००२) अन्वये केले केले.

२) **फिर्यादी पक्षाचे किल पांचाळ यांचा युक्तीवाद :** सत्र न्यायालयाच्या या आदेशास दंग्यासंबंधी प्रकरणांची चौकशी करणाऱ्या 'स्पेशल इन्व्हेस्टिगेशन' टीमचे पोलीस उपअधिक्षक यांनी आव्हान दिले. त्यांनी आपल्या प्रतिज्ञापत्रकात असे नमुद केले आहे की, संबंधित दंग्यात श्रीमती कोदनानी व त्यांच्या सहकाऱ्याचा प्रत्यक्ष सहभाग होता, असे जबाब अनेक प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांनी दिले आहेत. आता श्रीमती कोदनानी या राज्यमंत्री असल्याने साक्षीदारांचे जबाब व पुरावे यात काही फेरफार घडवून आणले जाण्याची शक्यता मोठ्या प्रमाणात वाढली आहे. आरोपींविरुद्धच्या पुराव्यांची योग्य छाननी न करता आणि त्यांच्या गुन्ह्यांचे गांभीर्य लक्षात न घेता सत्र न्यायालयाने त्यांना अटकपूर्व जामीन दिला आहे. एका साक्षीदाराच्या जबानीनुसार, कोदनानींनी दंगेखोरांना तलवारी वाटल्या आणि स्वतःच्या पिस्तुलातून गोळीबारही केला होता. हे गुन्हे अत्यंत गंभीर स्वरुपाचे आहेत. संबंधित आरोपींचा जातीय दंगे पेटवून मोठ्या प्रमाणात हत्या घडवून आणण्यात व मालमत्तेचे प्रचंड नुकसान करण्यात थेट सहभाग होता, हे पोलिस तपासातही सकृतदर्शनी स्पष्ट झाले आहे. याखेरीज, या तपास कामात आरोपींकडून पोलीसांना पूर्ण सहकार्यही मिळालेले नाही. सबब त्यांचा अटकपूर्व जामीन रद्द करण्यात यावा.

३) २८ फेब्रुवारी २००२ रोजी दाखल झालेल्या मूळ एफआयआरनुसार गोध्रा येथे २७ तारखेस रेल्वे गाडीचा डबा जाळण्याचा जो प्रकार घडला त्याच्या निषेधार्थ विश्व हिंदू परिषदेने २८ तारखेस 'गुजरात बंद' चे आयोजन केले आणि मग संपूर्ण गुजरातेत जातीय दंग्यांचा भडका




*शेकडो निरपराध लोकांचा गुजरातच्या दंगलीत बळी गेल्यानंतर या दंगलीला चिथावणी व प्रोत्साहन देणाऱ्या मुख्यमंत्री नरेंद्र मोदी यांना मुख्यमंत्रीपदावरुन हटवावे अशा घोषणा देऊन लोकंनी त्यांचा पुतळा जाळला होता.*

उडाला. त्यात मुस्लिम नागरिकांच्या मालमत्तेची लुटालूट व विध्वंस तर झालाच पण अनेक महिला व मुलेही ठार मारली गेली. या दंग्यांचे पुढारीपण विश्व हिंदू परिषद व भाजपच्या नेत्यांनी केले, असे पोलीसांनी दाखल केलेल्या एफआरआयमध्येही नमूद केलेले आहे. विशेष म्हणजे हजारो नागरिकांचा सहभाग असलेल्या या दंग्यांबद्दलच्या फिर्यादीत फक्त पाच विहिंप व भाजप कार्यकर्त्यांची नावे असून, त्यांच्याविरुद्ध इंडियन पीनल कोड १४३, १४७, १४८, १४९, ३०२, ३९५ व ४३६ आणि मुंबई पोलीस ॲक्ट च्या विभाग १३५ अन्वये गुन्हे नोंदविले गेले आहेत.

४) २००३ साली दाखल झालेल्या रिट पिटीशन संदर्भात (नं. १०९ क्रिमीनल) सर्वोच्च न्यायालयाने १८ मार्च ०८ ला दिलेल्या आदेशानुसार नरोदा पातिया व नरोदा गांव येथील दंग्यांच्या पुढील चौकशीचे काम सुरु झाले. ही चौकशी फक्त जबाबांसाठी पुढे येणाऱ्या नागरिकांच्या जबान्या नोंदविण्यापुरती मर्यादित राहू नये तर एसआयटीने आवश्यक ती अधिक माहिती मिळविण्यातही पुढाकार घ्यावा, असे सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशात नमुद करण्यात आले होते, आणि त्यासाठी राज्य सरकारला सवर्तोपरी सहकार्य करण्याच्या सूचना दिल्या होत्या. या प्रकरणी राज्य सरकारची भूमिका न्यायाची साथ देण्याची असून, कोणाही दोषी व्यक्तीस पाठीशी घालण्यात त्याला रस नाही, अशी ग्वाही त्याच्या वकिलांतर्फे देण्यात आलेली असली तरी विशेष तपास पथकाची नियुक्ती होणे जरुरीचे आहे, असेही या निकालपत्रात नमुद करण्यात आले होते. या स्थितीत, संबंधित दंगाप्रकरणाचा योग्य प्रकारे तपास व्हायचा तर कोणाही संशयितास अटकपूर्व जामीनासारखे शिक्षापूर्व संरक्षण दिले जाणे सर्वथा अयोग्य आहे.



गुजरातमध्ये नरेंद्र मोदींच्या आशीर्वादाने घडून आलेली जातीय दंगल किती भीषण होती हे दाखविणारे छायाचित्र.

४.१) नरोदा पतिया व नरोदा गांव दंग्याची झळ बसलेल्या अनेक निरपराध नागरिकांना आजही अनेक प्रकारच्या दबाव व दडपणांना तोंड द्यावे लागत आहे. त्यांना धाकदपटशा दाखविला जात असल्याने काही साक्षीदारांच्या जबान्यांवरुन स्पष्ट झाले आहे, आता हे सर्व थांबवायचे आणि या प्रकरणाची अधिक काटेकोर चौकशी करायची तर अटकपूर्व जामीन मिळालेल्या आरोपींसह अन्य अनेक व्यक्तींना पोलीस कोठडीत पाठविणे जरुरीचे आहे.

अटकपूर्व जामीनामुळे गुन्ह्याच्या तपासकामात काही अडथळा येत असेल तर साधकबाधक विचार करुनच न्यायालयाने त्यासंदर्भात योग्य निर्णय घेतला पाहिजे, असे पाकर राम विरुद्ध राजस्थान सरकार (१९८५) या खटल्यातील निकालपत्रात सर्वोच्च न्यायालयाच्या त्रिसदस्यीय खंडपीठाने नमुद केले आहे. खुनासारख्या गंभीर गुन्ह्यात अडकल्याचा आरोप असलेल्या व्यक्तीस हा जामीन काही असाधारण परिस्थिती असेल तरच देणे योग्य ठरेल. अन्यथा जनतेच्या न्यायालयावरील विश्वासाच धोका पोचू शकतो.

किरण देवी विरुद्ध राजस्थान सरकार (१९८७) या खटल्यातही गुन्ह्याचा तपास पूर्ण झाला नसेल तर अटकपूर्व जामीन देऊ नये, हे तत्त्व मान्य केले गेले आहे.

सतीश जग्गी वि. छत्तीसगड सरकार (२००८) या खटल्याच्या निकालपत्रात सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, गुन्हा अजामीनपात्र असेल तरी काही विशेष परिस्थितीत अटकपूर्व जामीन देता येतो, परंतु गुन्ह्याचे स्वरुप समाजाची लोकशाही प्रणाली धोक्यात आणणारे असेल तर मात्र न्यायमूर्तींनी बारकाईने विचार करुनच निर्णय दिला पाहिजे.

गोबरभाई सिंघाला विरुद्ध गुजराथ सरकार (२००८) या खटल्याच्या निकालपत्रात सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, जामीन अर्जाचा विचार करतांना १) आरोपीने गुन्हा केला आहे हे सकृतदर्शनी सिद्ध करणारा काही पुरावा आहे काय २)

आरोपाचे स्वरुप व गांभीर्य ३) आरोपी फरारी होण्याची शक्यता ४) आरोपीचे समाजातील स्थान, चारित्र्य व एकूण वर्तन ५) जामीन दिला गेल्यास 'न्याय' संकल्पनेसच धोका आदि गोष्टी

फिर्यादी पक्षाचे वकिल पांचाळ यांनी आपल्या युक्तीवादात पंचानन मिश्रा वि. दिगंबर मिश्रा (२००५), महाराष्ट्र सरकार वि. महंमद साजिद हुसेन (२००८), सीबीआय वि. अनील शर्मा (१९९७) आणि दिनेशकुमार नायक वि. गुजराथ सरकार (२००३) या खटल्यांत दिल्या गेलेल्या निकालपत्रांचाही उल्लेख केला आणि नरोदा पातिया व नरोदा गांव दंगाप्रकरणात माय कोदनानी व त्यांच्या सहकाऱ्यांचा सक्रीय सहभाग असल्याचे पुरावे विशेष तपास पथकास मिळाले असल्याचे निदर्शनास आणून दिले. अयोग्य गोष्टींच्या आधारे आरोपींना मुदतपूर्व जामीन दिले गेले असल्याने ते रद्द करावेत, अशी विनंती न्यायालयास करतांना त्यांनी तपास कामात आरोपींकडून पोलिसांना आवश्यक ते सहकार्यही मिळाले नसल्याचे न्यायालयाच्या नजरेस आणून दिले.

त्यांचा प्रतिवाद करताना आरोपींचे वकिल एस. व्ही. राजू, वाय.एन.ओझा व महेश जेठमलानी यानी आरोपी हे राजकारण व सार्वजनिक जीवनातील बडे नेते असल्याचे सांगितले. आपल्या अशीलांची राजकीय कारकिर्द धोक्यात आणण्यासाठी त्यांना या गंभीर गुन्ह्याच्या कटात गोवले गेले असल्याचा आरोपही त्यांनी केला. या प्रकरणाची चौकशी विशेष तपास पथकातर्फे दीर्घकाळ सुरु असून अनेक आरोपपत्रेही न्यायालयात दाखल केली गेली आहेत. परंतु आपल्या अशीलांवर मात्र अद्यापपावेतो कोणतेही आरोप ठेवले गेलेले नाहीत वा त्यांना अटक करणे समर्थनीय ठरेल, असा कोणताही नवा पुरावाही तपास पथकास मिळालेला नाही, असेही या प्रतियुक्तीवादात सांगण्यात आले.

फिर्यादी व आरोपींच्या वकिलांचे युक्तीवाद संपल्यावर दिलेल्या निर्णयात न्या. वाघेला यांनी म्हटले आहे की, नरोदा पातिया व नरोदा गांव येथे २००२ साली झालेल्या दंग्यांत १०९ जण ठार व अन्य जण जखमी झाले. ही वस्तुस्थिती आहे. परंतु त्यास जबाबदार असलेल्या आरोपींसारख्या अनेक प्रतिष्ठित व्यक्तींची नावे तपास अधिकाऱ्यांनी प्रत्यक्षदर्शी व्यक्तींच्या जबान्यातून जाणीवपूर्वक वगळली. त्यामुळेच पुढे हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले आणि त्याच्या साद्यंत चौकशीसाठी विशेष तपास पथक नेमण्याचा आदेश न्यायालयास द्यावा लागला. या सर्व प्रक्रियेत सहा वर्षांचा काळ गेला असला तरी त्यामुळे प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांच्या जबान्या परस्परविरोधी वा अविश्वसनीय



*निकालानंतर माया कोदनानी व त्यांच्या सहकाऱ्यात बातचीत चालू असताना.*

ठरत नाहीत. विशेष म्हणजे २००२ साली हे प्रकरण न्यायालयात गेले तेव्हाच किमान सहा साक्षीदारांनी आपल्या जबानीत आरोपींची नावे सांगितली होती, त्यामुळे आता ही नावे प्रथमच पुढे येत आहेत, हे आरोपीच्या वकिलांचे म्हणणे मान्य करता येत नाही. दंगेखोर जमावाचे नेतृत्व हेच आरोपी करीत होते आणि अल्पसंख्याकांच्या वस्त्यांवर हल्ले चढविण्याची चिथावणी त्यांनीच दंगेखोरांना दिली. त्यावेळी आरोपींनी जमावातील काही व्यक्तींना शस्त्रे व ज्वालाग्राही पदार्थही दिल्याचे काही जबान्यांत स्पष्टपणे नमुद केले गेले होते. परंतु तपास अधिकाऱ्यांनी ती नांवे नोंदवून मात्र घेतली नाहीत. अर्थात दंग्यांच्या प्रत्यक्ष ठिकाणी आरोपी फार थोडा वेळ होते आणि त्यांनी तेथे नेमका किती काळ घालविला, याबद्दल संबंधित जबान्यात वेगवेगळी माहिती दिली गेली, हेही खरे आहे. या गफलतीमुळेच पुढे आरोपींना संशयाचा फायदा व पर्यायाने अटकपूर्व जामीन मिळविणे शक्य झाले.

आता मात्र एकंदर परिस्थितीचा साकल्याने विचार करता असे म्हणता येईल की संबंधित आरोपींचा नरोदा दंग्यांशी संबंध असल्याचे सकृतदर्शनी सिद्ध झाले असून या प्रकरणाची अधिक खोलात जाऊन चौकशी होणे जरुरीचे आहे. आत्तापर्यंत किमान चाळीस साक्षीदारांच्या जबान्यात आरोपींच्या नावांचा उल्लेख झालेला आहे. तसेच २००२ च्या दंग्याचेवेळी काही स्थानिक

अधिकाऱ्यांनी संशयास्पद भूमिका बजावल्याचेही उजेडात आलेले आहे. या स्थितीत आरोपींचा अटकपूर्व जामीन रद्द करणेच योग्य ठरेल. २००२ साली नोंदविल्या गेलेल्या काही जबान्यांमध्ये किरकोळ विसंगती असणे वा काही साक्षीदारांनी महत्त्वाच्या गोष्टी टाळून जबान्या देणे हा प्रकार आधीच्या चौकशी यंत्रणेच्या बेजबाबदारपणामुळे व अयोग्य कार्यपद्धतीमुळे घडला असून, त्यामुळेच तर या प्रकरणाच्या चौकशीचे काम सर्वोच्च न्यायालयास नंतर विशेष तपास पथकाकडे सोपवावे लागले आहे. काही महत्त्वाच्या व्यक्तींनी आधीच्या चौकशी यंत्रणेवर दबाव आणून आपली नांवे संबंधित प्रकरणात गोवली जाणार नाहीत याची खबरदारी घेतली आणि त्यामुळेच पुढे चौकशीचे गाडे रुळावरुन घसरले, हे स्पष्ट दिसते.



नरोड्यात दंगा झाला तो विश्व हिंदू परिषदेच्या 'गुजरात बंद' आंदोलनामुळे आणि त्यावेळी काही काळ का होईना पण संबंधित आरोपी तेथे हजर होते, याबद्दल आता कोणाच्याही मनात शंका नाही. सशस्त्र, दंगेखोर जमावास शांत करुन परिस्थिती आटोक्यात आणण्याऐवजी आरोपींनी चिथावणीखोर वर्तन केले आणि जातीय दंग्याचे थैमान नरोड्यात घडवून आणले. त्यांच्या या द्वेषमूलक राजकारणामुळे जनसामांन्यामध्ये भिती व दहशतीचे जे वातावरण निर्माण झाले ते निवळण्यास आता कदाचित अनेक दशकांचा काळ लागणार आहे. काही मुठभर व्यक्तींनी हजारो दंगेखोरांच्या माध्यमातून जे गंभीर गुन्हे केलेले आहेत त्याचे वर्णन 'पाशवी' या एकाच शब्दात होऊ शकते.

**पंजाब सरकार वि. राकेशकुमार (२००८) या खटल्याच्या निकालपत्रात सर्वोच्च न्यायालयाने म्हटल्याप्रमाणे ''परस्पर वैमनस्यामुळे' केल्या गेलेल्या खुनाबद्दल कदाचित देहदंड ठोठावला जाणे योग्य ठरणार नाही परंतु निष्पाप नागरिकांच्या सामुहिक हत्या म्हणजे पूर्व नियोजित संघटीत गुन्हा असून त्याबद्दल संबंधितांना फाशीची शिक्षाच सुनावली गेली पाहिजे. ही कठोर शिक्षाच अशा गुन्ह्यांना पायबंद घालण्यास उपयुक्त ठरेल. अर्थात अशा संघटीत गुन्ह्यांचे तपासकाम एका यंत्रणेकडून दुसऱ्या यंत्रणेकडे जात जात अखेर सर्वोच्च न्यायालयात पोचते आणि त्यात खूप मोठा कालापव्ययही होतो... परंतु तो होत असतांना गुन्ह्यात हात असल्याचा संशय ज्यांच्यावर आहे त्यांना अटकपूर्व जामीनासारखे संरक्षक कवच मिळणे मात्र अजिबात योग्य नाही.**

संशयित आरोपी समाजात नेते म्हणून वावरत आहेत आणि त्यांनी आपल्याविरुद्धचे पुरावे नष्ट करण्यासाठी काहीही प्रयत्न केलेले नाहीत. सबब त्यांना जामीन दिला जावा हा युक्तीवाद अतिशय अयोग्य व विपरीत आहे. विशेषतः संबंधित गुन्ह्याच्या चौकशीचे काम सुरु असतांना संशयित व्यक्ती सत्तापदस्थ असणे हे तर सर्वथा आक्षेपार्हच मानले पाहिजे. नरोड्यात झालेल्या दंग्याच्या चौकशीचे काम सात-सात वर्षे रेंगाळावे हा प्रकार दुर्दैवी असून, कायदा-सुव्यवस्था यंत्रणांचे घोर अपयश म्हणूनच त्याकडे पाहिले पाहिजे. परंतु हा कालापव्यय झाला असला तरी दंग्यास जबाबदार असणाऱ्या सर्व आरोपींना कठोर शासन हे मिळालेच पाहिजे. भारतासारख्या प्रगत धर्मनिरपेक्ष-लोकशाही प्रजासत्ताकात बंधुभावाने नांदणाऱ्या कोटी-कोटी नागरिकांचे जीवन उध्वस्त करु पाहणाऱ्या उन्मत्तांना उशीरा का होईना पण वठणीवर आणणे ही आपली सर्वांचीच जबाबदारी आहे. जातीय सामंजस्य हाच लोकशाहीचा प्रमुख विशेष असतो--- कोणी धर्माचे नाव घेऊन इतरांची हत्या करीत असेल तर कायद्याचे राज्य मानणाऱ्या समाजास तते लांछनच आहे. धार्मिक माथेफिरु हे कोणत्याच धर्माची बांधिलकी मानणारे नसतात. त्यांची तुलना निरपराध नागरिकांची विनाकारण हत्या करणाऱ्या दहशतवाद्यांशीच होऊ शकते.

एकंदर सर्व परिस्थिती आणि उपरनिर्दीष्ट कारणमिमांसा लक्षात घेऊन हे न्यायालय ५ फेब्रु. २००९ रोजी देण्यात आलेले सर्व आदेश रद्दबातल ठरवित आहे आणि नरोदा दंग्याशी संबंधित आरोपींचा अटकपूर्व जामीन रद्द करीत आहे. हा निर्णय सहा आठवड्यांसाठी स्थगित ठेवावा ही आरोपींचे वकील श्री. राजू यांची विनंती अमान्य करण्यात येत आहे.

●●●

# ...अन् बाळ वरुणला कंठ फुटला!



- प्रकाश बिनसाळे,
प्रवक्ता, राष्ट्रवादी काँग्रेस

**राष्ट्रीय राजकारणात ज्याचे स्थान आत्तापर्यंत तरी 'बिग झिरो'च आहे, त्या फिरोज वरुण गांधीला आता 'हिंदूचा हिरो' बनण्याच्या वेडाने पछाडले आहे, असे दिसते. त्या वेडाच्या भरात त्याने नुकतीच आपल्या पिलिभीत मतदारसंघात काही प्रक्षोभक भाषणे केली आणि साऱ्या देशाचे लक्ष स्वत:कडे वेधून घेतले. भाजप हा जातीयवादी व मुस्लीमद्वेष्टा पक्ष आहे, हे सर्वचजण जाणतात. परंतु फिरोज वरुण सारख्या युवा नेत्याच्या सर्वथा बेजबाबदार व राष्ट्रद्रोहीच म्हणाव्या अशा विचारांचे, तो समर्थन करु पाहतो तेव्हा 'आता मात्र हद्द' झाली असेच म्हणावे लागते.**

सार्वत्रिक निवडणुकीच्या वाऱ्यांनी अद्याप देशाचे राजकीय अवकाश कोंदुन गेले नसतानाच अचानक एका 'वरुणा'चे गरजणे आणि बरसणे सुरु झाल्यामुळे सध्या सारे सुज्ञ जनमानस चकित झाले आहे. 'नेहरु-गांधी घराण्यां'चे 'पहिले वारसदार' म्हणून एकीकडे सोनियाजी व राहुल हे माय-लेक केंद्रीय सत्तेचे सूत्रचालन करीत असताना दुसरीकडे त्याच घराण्याचे 'दुसरे वारसदार' असलेली मनेका व फिरोज वरुण ही मायलेकांची तशी अडगळीत पडलेली दुसरी जोडीही आता पुन्हा एका प्रकाशात आली आहे. त्यांच्यावर हा प्रकाशझोत पाडण्याचे मुख्य कारण आहे ती युवा नेता वरुणची ताजी वाद्‌ग्रस्त वाणी! उत्तर प्रदेशातील पिलिभित मतदारसंघात भारतीय जनता पक्षाचा उमेदवार म्हणून उभा राहिलेला वरुण गेली ३-४ वर्षे आपल्या घराण्याची पुण्याई आणि उपद्‌व्यापी मनेका मातेचे कृपाछत्र यांच्या बळावर बड्या-बड्या राजकीय नेत्यांच्या मांडीला मांडी लावून बसत असला तरी अभ्यास-अनुभव व सेवावृत्तीचा पूर्ण अभाव असल्यामुळे अद्याप तरी देशाच्या सोडा पण उत्तरप्रदेशच्या स्थानिक राजकारणातही त्याचे स्वत:चे असे काहीही स्थान निर्माण झालेले नाही. त्याची जाणीव असल्यामुळेच की काय त्याने नुकतीच आपल्या प्रचाराला सुरुवात केली आहे ती अनेक आक्षेपार्ह व प्रक्षोभक वक्तव्ये करुनच! आपण कट्टे राष्ट्रभक्त आणि कडवे हिंदुत्वनिष्ठ आहोत, असा आव आणून वरुणने केलेल्या या साऱ्या वाह्यात वक्तव्यांचा रोख आहे तो पूर्णपणे अल्पसंख्य मुस्लीम समाजावर. **'हिंदुस्थानात राहण्याचा हक्क फक्त हिंदूनाच असून, इतर सर्वांना पाकिस्तानात हाकलून दिले पाहिजे' एवढेच बोलून वरुन थांबलेला नाही तर 'आपला हात हा कमळधारी हात आहे, निवडणुका पार पडल्या की तो मुस्लीमांचे गळे चिरण्याचे काम करेल' अशी उन्मत्त दर्पोक्तीही त्याने केली आहे.**

निवडणूक प्रचार मोहिमेत राजकीय पक्षांच्या नेत्यांनी पक्षीय अधिनेवेशाच्या आहारी जाऊन आक्रमक भाषा वापरणे आणि प्रतिस्पर्ध्यावर शाब्दिक वार करणे, यात फार काही गैर आहे, असे कोणीच मानत नाही. परंतु बाळ 'वरुण'चे हे गरजणे- बरसणे म्हणजे सभ्यता आक्षेपार्ह यांचे उल्लंघन आहे. 'ढेकणासंगे हिरा भंगला' या न्यायानुसार, जातीयवादी भाजप व रा.स्व. संघाची संगत या कोवळ्या तरुणाला बाधलीय असे म्हणून त्याकडे दुर्लक्ष झाले तर मोठा अनावस्था प्रसंग ओढवेल.

विशेष म्हणजे हे आक्रस्ताळी भाषण सीडी स्वरूपात निर्वाचन आयोगाकडे पोचल्यानंतर आणि त्याची दखल घेऊन पोलिस खात्याने अलाहाबाद उच्च न्यायालयात तक्रार गुदरल्यावर



*आता इतके पोळल्यावर वरुण गांधींनी तोंडावर बोट ठेवले तर नवल वाटायला नको.*

वरुणने 'घुमजाव'चा पवित्रा घेतला आणि आपण जे काही बोललो ते स्थानिक मुस्लिमांना उद्देशून नव्हे तर सीमेपलिकडून येत असलेल्या घुसखोरांना उद्देशून होते, अशी मखलाशी सुरु केली. त्याची ही कृती त्याच्यात एक खारावलेला निगरहट्ट राजकारणी लपलेला आहे हे तर सिद्ध करतेच परंतु त्याच्या व भाजपच्या राजकीय विश्वासार्हतेबद्दल जबदरस्त शंका निर्माण करण्यास हातभारही लावते. खरे पाहता, वरुणच्या या वादग्रस्त भाषणाचे वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर भाजपच्या स्वत:ला फार सभ्य व सुसंस्कृत समजणाऱ्या नेत्यांनी त्याचा तीव्र निषेध करणे जरुरीचे होते परंतु 'वरुण जे काही बोलला ते त्याचे वैयक्तिक विचार आहेत पक्षाच्या ध्येयधोरणांचा त्याच्याशी काहीही संबंध नाही' असे सांगून भाजप प्रवक्ते रवीशंकर प्रसाद यांनी हात झटकले. एक शिवसेना वगळता बाकी सर्व राजकीय पक्ष वरुणच्या जातीयवादी वक्तव्यांचा एकमुखाने धिक्कार करीत असताना आणि 'वरुणला लोकसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरविले जाऊ नये, अशी शिफारस निवडणूक आयोगाकडून




झालेली असताना सर्वच भाजप नेत्यांनी वरुण बचाव'चे धोरण अवलंबिले आहे. अशा प्रकारची शिफारस करण्याचा अधिकारच निवडणूक आयोगाला नाही ही अरुण जेटली याची वकिली प्रतिक्रिया काय किंवा 'वरुण हा आमचा उमेदवार राहणारच' हा पक्षाध्यक्ष राजनाथ सिंहाचा हट्टाग्रही निर्वाळा काय, हे सारे 'एक डालके पंछी' आहेत, हेच सिद्ध करतात. अर्थात त्यांनी तसे असावे यात आश्चर्य वाटावे, असे काहीही नाही. कारण भाजपच्या हिंदुत्ववादी राजकारणाचा पायाच मुळी देशातील अल्पसंख्यांकांचा द्वेष हा आहे. या द्वेषापोटीच १९९०च्या दशकात अयोध्येतील 'बाबरी मशीद' उध्वस्त केली गेली, नव्या शतकाच्या प्रारंभ गोध्रा हत्याकांडाचे निमित्त घेऊन गुजरातसारख्या अहिंसक व शांतताप्रेमी राज्यात जातीय दंग्यांचा वणवा पेटविला गेला, सार्वत्रिक निवडणुका तोंडावर आलेल्या असताना ओरिसात ख्रिश्चनांवर हल्ले चढविले गेले आणि आता बाल 'वरुण'च्या मुखातून मुस्लीमांची चेष्टा केली जात आहे, त्यांना धमकावले जात आहे. पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांनी म्हटल्याप्रमाणे 'वरुण खरेच असे काही विपरीत बोलला असेल तर ती खरोखरच अतिशय दुर्देवाची बाब मानावी लागेल.'

दरम्यान, वरुणची मोठी चुलत बहिण आणि नेहरु - गांधी घराण्याची आणखी एक वारसदार प्रियांकाने या धक्कादायक प्रकरणावर भाष्य करताना वरुणला आपल्या घराण्याच्या परंपरा व मूल्यांची आठवण करुन दिली आणि 'भगवंतांनी गीतेमध्ये जे सांगितले ते समजावून घेण्याचा सल्लाही दिलाय.'

अर्थात प्रियांकाचा हा सल्ला भाजपच्या आहारी गेलेल्या वरुणच्या पचनी कितपत पडेल, याबद्दल शंकाच आहे. कारण एक तर 'लाथोंके भूत बातोंसे नही मानते' आणि दुसरे म्हणजे मुस्लिमांवर आगपाखड करुन साऱ्या देशाचे लक्ष स्वत:कडे वेधून घेण्याची नियोजनबद्ध खेळीच सध्या तो खेळत आहे आणि त्याची ही खेळी चांगली यशस्वीही झालेली आहे. कालपर्यंत या 'अदर गांधींची दखल देशातील प्रमुख सोडा पण चिल्लर वृत्तपत्रेही अगदी अभावानेच घ्यायची परंतु ताज्या-वादग्रस्त भाषणानंतर मात्र तो केवळ वृत्तपत्रेच नाही तर इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमांच्या दृष्टीनेही 'हीट अँड हॉट प्रॉपर्टी' बनला आहे. ते लक्षात आल्यामुळेच वरुणने आपला सुर अधिक आक्रमक

केला असून, आपली बाजू समजावून ऐकून न घेताच आपल्याला सुळावर लटकावण्याचा प्रयत्न केल्याचा ठपका निवडणूक आयोगावर ठेवला आहे. अर्थात आपण तर केवळ प्रक्षोभक विधानेच केली परंतु त्यापेक्षा कितीतरी अधिक गंभीर स्वरूपाचे गुन्हे केलेली अनेक मंडळी बड्या राजकीय पक्षांचे उमेदवार म्हणून निवडणुकीच्या आखाड्यात उतरली आहेत, हा त्याचा युक्तीवाद मात्र निश्चितच विचार करण्यासारखा आहे. 'निवडून येण्याची क्षमता' या एकमेव निकषाआधारे सर्व प्रमुख राजकीय पक्षांचे बहुतेक सर्व उमेदवार ठरत असल्यामुळेच गेल्या काही काळात आमच्या राजकारणाचे झपाट्याने गुन्हेगारीकरण झाले आहे आणि आता 'वरुणसारखे' घराण्याची पुण्याई वगळता अन्य कोणतीही विशेष योग्यता नसलेले ताज्या दमाचे वीर (!) नेमका त्याचाच लाभ उठवू पाहात आहेत. देशात जातीयवाद व धर्मांधतेचे विष पेरावे, अल्पसंख्य मुस्लिमांविषयी सदैव तिरस्कार व वैराची भाषा बोलून सामाजिक ऐक्य धोक्यात आणावे आणि मग त्यामुळे तापलेल्या तव्यावर आपली सत्तेची पोळी अगदी आरामात भाजून घ्यावी, हा आता संघ परिवार व





भाजपशी संबंधित अनेक सुमार दर्जाच्या मंडळींचा धंदाच होऊन बसला आहे. आतापर्यंत प्रवीण तोगडियांसारखे वाचाळ वीर त्यात आघाडीवर होते, आता त्यांची जागा वरुण गांधी घेऊ पाहत आहे. त्याला वठणीवर आणण्यासाठी नेमके काय करायचे, हे आपले सरकार, पोलीस व निवडणूक आयोग ठरवेलच, परंतु देशभरातील सर्व सुजाण राष्ट्रहितैषी नागरिक आणि धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादी शक्तींनीही या प्रकरणात अधिक गांभीर्याने लक्ष घालणे गरजेचे आहे. बुद्धीचा फारसा पाचपोच नसलेल्या अशा नाठाळांच्या बेजबाबदार वक्तव्यांना काय महत्व द्यायचे, असा सुज्ञ विचार करुन त्यांनी या कुटील कटावर पडदा पडू दिला तर इतिहास त्यांना क्षमा करणार नाहीच पण विविधतेत एकता जपणाऱ्या या महान विश्वबंधुत्ववादी देशाचे भविष्यही अंध:कारमय होईल. अर्थात अन्य कोणी नसले तरी या देशातील 'मतदार राजा' हा निश्चितच खूप शहाणा आहे. तो गरीब आहे, अशिक्षित आहे, दुबळा आहे परंतु आपल्या सामाजिक सलोख्यास व राष्ट्रीय सुरक्षिततेस सर्वाधिक धोका वरुणसारख्या अतिरेकी जातीय वाद्यांपासूनच आहे, याची जाण मात्र त्यालाच सर्वाधिक आहे. त्यामुळे येत्या निवडणुकीत हा मतदार राजा आपला मतदानाचा हक्क अगदी काळजीपूर्वक वापरेल आणि सर्व राष्ट्रद्रोही शक्ती व व्यक्तींना चांगला धडा शिकवेल, अशी आम्हाला केवळ आशा नाही तर खात्री वाटते.

●●●





# भाजपवर रा. स्व. संघाची पुन्हा मजबूत पकड

- मुकुंदानंद

**भाजप हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अपत्य आहे, हे सारेचजण जाणतात. मध्यंतरी अटलजींसारख्या सम्यक बुद्धीच्या, अफाट लोकप्रिय नेत्याकडे भाजपची सूत्रे असल्याने कडव्या हिंदुत्ववादी संघ परिवाराच्या भाजपांतर्गत हस्तक्षेपास बराच आळा बसला होता; परंतु आता एकीकडे वाजपेयींची निवृत्ती आणि दुसरीकडे सरसंघचालकपदी मोहनराव भागवत यांच्यासारख्या मुरब्बी, संघटन कुशल नेत्याची झालेली नियुक्ती यामुळे सारेच चित्र बदलणार आहे; भाजपवर रा. स्व. संघाची पुन:श्च मजबूत पकड बसणार आहे.**

'गांधीवादी समाजवादा'ची जपमाळ ओढत आणि देशभरातील अल्पसंख्यांकांच्या बाबतीत आपले धोरण अजिबात द्वेषमूलक नाही, अशी मानभावी कबुली देत भारतीय जनता पक्ष सार्वत्रिक निवडणुकीच्या आखाड्यात उतरला असला तरी त्यावर पुन्हा एकदा 'मनुवादी' राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची मजबूत पकड बसणार, अशी स्पष्ट चिन्हे आता दिसू लागली आहेत. खरे पाहाता रा. स्व. संघ ही भाजपची 'माता-पिता-गुरू' ('मदर' ऑर्गनायझेशन) असे सर्व काही आहे, हे सर्वच जण जाणतात. परंतु गेल्या काही काळात मुख्यत: बुजुर्ग नेते अटलबिहारी वाजपेयी यांच्या प्रागतिक, उदारमतवादी विचारप्रणालीमुळे या 'माय-लेकांत' काहीसा दुरावा निश्चितपणे निर्माण झाला होता.

आपल्या गेल्या पाच दशकांहून अधिक काळाच्या प्रदीर्घ राजकीय वाटचालीत अटलजींनी 'संघ' स्वयंसेवक असल्याचा अभिमान अनेकवेळा बोलून दाखविलेला असला तरी त्यांच्यावर संघाच्या कर्मठ हिंदुत्ववादाचा नव्हे तर पंडित जवाहरलाल नेहरुंच्या उदारमतवादी, लोकशाही विचारधारेचा सर्वाधिक प्रभाव होता व आहे, याची कबुलीही त्यांच्याकडूनच असंख्य वेळा दिली गेलेली आहे. साहजिकच १९९५ ते २००५ या दशकभरात केवळ भाजपचे नव्हे तर राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे व संपूर्ण देशाचेही नेतृत्व करण्याची संधी मिळाल्यानंतर अटलजींनी आपल्या निकटच्या वर्तुळात महत्त्वाचे स्थान दिले ते संघ परिवारातील कोणा जुनाट महंतांना नाही, तर प्रमोद महाजन यांच्यासारख्या व्यवहारकुशल युवा राजकारणी नेत्यासच! किंबहुना त्यामुळेच तर त्यांना देशभरातील तब्बल दोन डझन प्रादेशिक पक्ष व गटांना भाजपच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीकडे आकर्षित करणे शक्य झाले आणि या देशाचे पंतप्रधानपद सहा वर्षांहून अधिक काळ भोगण्याचे भाग्यही लाभले. अर्थात पंडितजींचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून त्यांनी अंगिकारलेली परमसहिष्णुता व उदारता भाजपला राष्ट्रीय राजकारणाच्या केंद्रस्थानी घेऊन गेली बरी त्यामुळे त्या पक्षाच्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाबरोबरच्या बंधुभावास मात्र जरूर तडा गेला.

स्वातंत्र्योत्तर काळात, या देशात समान नागरी कायदा लागू व्हावा, जम्मू-काश्मीरसारख्या सीमावर्ती -संवेदनशील राज्यास 'खास दर्जा' देणारे घटनेतील ३७० वे कलम रद्द करावे, गोहत्या बंदी व्हावी आणि मुख्य म्हणजे मातृभूमीशी द्रोह करून देशाची फाळणी घडवून आणणाऱ्या अल्पसंख्य मुस्लिमांचे तथाकथित तुष्टीकरण थांबावे म्हणून रा. स्व. संघाच्या प्रेरणेने व प्रोत्साहनाने प्रथम जनसंघ व नंतर ते नाव बदलू लागलेल्या भाजपने अनेक आंदोलने केली. परंतु राष्ट्रीय जनमताचा व्यापक पाठिंबा नसल्यामुळे देशात तत्कालीक तणाव व असंतोष माजण्यावाचून त्यातून अन्य काहीच साध्य झाले नाही आणि राष्ट्रीय राजकारणात भाजप तसा एकाकीच राहिला. पुढे त्याचे हे एकाकीपण संपले ते मुख्यत: 'रामजन्मभूमी'चा अनावश्यक धार्मिक मुद्दा उकरून अडवानींची 'रथयात्रा' निघाल्यानंतरच!

या रथयात्रेमुळे निर्माण झालेल्या काँग्रेसविरोधी लाटेचा अचूक लाभ उठवून महाजन आदि नेत्यांनी 'अबकी बारी, अटलबिहारी' ही घोषणा लोकप्रिय केली आणि एकवेळ लोकसभेत फक्त दोनच सदस्य (अटलजी व अडवानी) असलेल्या आपल्या पक्षाचे संख्याबळ चक्क दोनशेच्या घरात पोचविले. १९९५ ते २००४ हा काळ भाजपच्या दृष्टीने खरोखरच 'सुवर्णकाळ' होता. त्याचा आनंद लुटताना अटलजींनी आपल्या मूळ सूत्रधारांना, - रा. स्व. संघाच्या नागपूर मुख्य कार्यालयातील दुढ्ढाचार्यांना, - त्यांच्या मुस्लीम द्वेषावर आधारित पारंपरिक कार्यक्रम पत्रिकेसह तसे गुंडाळूनच ठेवले होते. कारण त्यांनी त्या कार्यक्रम पत्रिकेतील एखाद्या मुद्द्याची जरी अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला असता तरी त्यांचे सरकार एक दिवसही टिकू शकले नसते.

भाजपचे नेते उठता-बसता सेवाधिष्ठीत, त्यागपूर्ण राजकारणाच्या गप्पा मारीत असले आणि आपण इतर राजकीय पक्षांच्या नेत्यांपेक्षा अगदी वेगळे असल्याची (पार्टी वुइथ ए डिफरन्स!) शेखी मिरवत असले तरी त्यात काहीही अर्थ नाही, हे अटलजींच्या राजवटीत अगदी निरपवादपणे सिद्ध झाले. सत्ता मिळविण्यासाठी व टिकविण्यासाठी हव्या त्या (खरं तर नको त्या) सर्व तडजोडी अगदी विनासंकोच करणारे अटलजी व त्यांचे सारे 'संघिष्ठ' सहकारी त्यावेळी खुद्द संघ परिवारातच इतके अप्रिय झाले होते की बस्स! त्यावेळी रा. स्व. संघाच्या सरसंघचालकपदी प्रा. राजेंद्रसिंह यांच्यासारखा आंतरराष्ट्रीय ख्यातकीर्त वैज्ञानिक - विचारवंत होता. त्यांना भाजप नेतृत्वाच्या संधीसाधू राजकीय तडजोडी अर्थातच अमान्य होत्या; परंतु परममित्र अटलजींविषयीच्या आपुलकीमुळे म्हणा वा व्यवहाराचे भान असल्यामुळे म्हणा, 'मौनं सर्वार्थ साधनम्' तत्त्वाचा त्यांनी अंगीकार केला;

पण त्यांच्यानंतर सरसंघचालकपदी आलेल्या के. एस. सुदर्शनजींनी मात्र 'उग्र रूप धारण केले आणि देशाचे सर्वांत वाईट पंतप्रधान (वर्स्ट मोस्ट प्राइममिनिस्टर) अशा तीव्र शब्दांत वाजपेयींची निर्भत्सना सुरू केली. या देशात हिंदूराष्ट्रवादाची उभारणी करणे आणि फाळणीनंतरही भारतात राहून कुरापती

करणाऱ्या सर्व मुस्लिमांना पाकिस्तानात (संघियांच्या भाषेत, 'पापस्थानात') हाकलून देणे, या रा. स्व. संघाच्या प्रमुख ध्येयाची पूर्तता होणार नसेल तर वाजपेयी सरकारची पाठराखण करायची तरी कशासाठी असा त्यांचा खडा सवाल होता. विशेष म्हणजे एकीकडे खुद्द सरसंघचालक असे क्रुद्ध झालेले असताना दुसरीकडे दत्तोपंत ठेंगडी यांच्यासारखे संघाची कामगार आघाडी सांभाळणारे बुजुर्ग नेतेही अटलजींवर नाराज होते.

आधीचे काँग्रेसी पंतप्रधान नरसिंहराव व अर्थमंत्री मनमोहनसिंग यांनी पुरस्कारलेल्या खुल्या, निर्बंधमुक्त आर्थिक धोरणांचा अंगीकार वाजपेयी सरकारने करणे त्यांना साफ नामंजूर होते. ''हे धोरण म्हणजे संघाच्या स्वदेशी व स्वावलंबन या तत्त्वांची घोर पायमल्ली आहे'', अशी टीका करून दत्तोपंत थांबले नाहीत तर वाजपेयींनी देश विकायला काढलाय', असा बेलगाम आरोप करण्यापर्यंत त्यांची मजल गेली. संघाचे हे सर्व जुने, वयोवृद्ध नेते तत्त्वनिष्ठ होते, यात शंका नाही परंतु त्यापैकी बहुतेकांची खरी मळमळ ''केंद्रात भाजप सत्तेवर आल्यानंतर फक्त अटलजी व अडवानी या दोघांचा फायदा झाला, इतरांच्या पदरात त्या मानाने फारसे काही पडले नाही'', ही आणि हीच होती. या मळमळीतूनच नंतरच्या काळात अटलजींना पर्याय ठरू शकेल, असा नेता संघ परिवाराने नरेंद्र मोदींच्या रूपात गुजरातमध्ये उभा केला. 'कडवा हिंदुत्ववादी' म्हणून असलेली प्रतिमा हे मोदींचे सर्वांत मोठे बलस्थान आहे. ही प्रतिमा त्यांनी आणखी उजळ केली (कां काळवंडली?) ती 'गोध्रा हत्याकांडा'नंतर गुजरातमध्ये ठिकठिकाणी भीषण जातीय दंगे घडवून! विशेष म्हणजे, त्यांचे हे भयानक औद्धत्य पाहून त्यावेळी पंतप्रधानपदी असलेले अटलजीही संतापले होते, चक्रावले होते; पण संघपरिवाराचे दडपण असल्याने राजधर्माचे पालन करा' एवढा एक सल्ला मोदींना देण्याव्यतिरिक्त ते काहीही करू शकले नाहीत.

हा सर्व 'इतिहास' येथे एवढ्यासाठी मांडला तो रा. स्व. संघाचे 'खरे रूप' प्रकाशात आणण्यासाठी! राष्ट्रपिता महात्मा गांधीजींच्या हत्याप्रकरणात महत्त्वाची भूमिका बजावलेले संघ स्वयंसेवक आपल्या प्रात: व सायं शाखांत 'नमस्ते सदा वत्सले मातृभूमे' ही प्रार्थना कितीही भक्तीभावाने करीत असले तरी 'देशापेक्षा धर्म मोठा, धर्मापेक्षा संघ मोठा आणि संघापेक्षा सरसंघचालक मोठा' ही आडमुठी भूमिका त्यांनी कधीही सोडलेली नाही. संघाचा कल हुकुमशाहीकडे, एकाधिकारशाहीकडे असून, त्यातूनच 'सरसंघचालक म्हणतील ती पूर्व दिशा' त्यांना विरोध म्हणजे राष्ट्रद्रोह', अशी काहीतरी विकृत व विपरीत विचारसरणी तेथे फोफावली आहे.



*'नमस्ते सदा वत्सले मातृभूमे' ही प्रार्थना म्हणणारे नेते प्रत्यक्षात देशापेक्षा धर्माला, संघाला व सरसंघचालकांनाच मोठे मानतात या वस्तुस्थितीकडे कानाडोळा करता येत नाही.*

अटलजींसारखी सर्वमान्य व अत्यंत लोकप्रिय व्यक्त भाजपच्या नेतृत्वपदी होती तोवर राष्ट्रजीवनात फारशी उलथापालथ करण्याचे साहस संघ परिवाराने केले नाही. 'संघ ही सांस्कृतिक कार्य करणारी राष्ट्रभक्त संघटना' असल्याचे आणि 'राजकारणात तिला काडीचाही रस नसल्याचे अगदी आत्ता -आतापर्यंत सांगितले जात होते, पण आता मात्र ते चित्र पूर्णपणे बदलण्याच्या मार्गावर आहे. गेल्या पंधरवड्यात नागपुरमध्ये संघाच्या प्रतिनिधी सभेची जी बैठक झाली त्यात अगदी अनपेक्षितपणे नवे सरसंघचालक म्हणून के. सुदर्शनजी याच्या जागी मोहनराव भागवत यांची निवड झाली आहे. हे भागवत महोदय भाजप व राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे पंतप्रधानपदाचे उमेदवार लालकृष्ण अडवाणी यांचे नि:स्सीम मित्र असले तरी संघाची सूत्रे त्यांच्याकडे म्हणजे 'अटलजी-अडवाणी युगाची अखेर' आहे, असेच मानले जाते. आता त्यांच्या कारकिर्दीत संघाचा भाजपच्याच नव्हे तर एकूण राष्ट्रीय राजकारणातील हस्तक्षेप खूप मोठ्या प्रमाणात वाढणे अपेक्षित आहे. आजवर हा हस्तक्षेप पडद्याआडून होत



होता परंतु यापुढे मात्र तो अगदी उघड-उघड होईल आणि त्याचा फायदा उठवून नरेंद्र मोंदीसारखे वाचाळ, वादग्रस्त नेते अधिकच थैमान घालतील अशी चिन्हे आहेत. एकीकडे आंतरराष्ट्रीय दहशतवादाची टांगती तलवार आणि दुसरीकडे भयावह आर्थिक मंदीचे सावट यांच्या कात्रीत सापडलेल्या आपल्या देशात आता रा.स्व. संघातील ताज्या खांदेवाल्यामुळे कडव्या हिंदुत्ववादाचे जुने भुत पुन्हा उभे राहणार असेल तर त्यापरते दुर्दैव नाही. राष्ट्रीय अस्मितेच्या नावाखाली हे भूत नाचवून संघ परिवाराने आजवर या देशात अनेक जातीय दंगे घडवून आणले आहेत, विविध जाती-धर्मांचे संमेलन असलेल्या या समाजात बंधुभाव व परस्पर प्रेमाचे विधायक वातावरण राहू नये यासाठी प्रयत्न केले आहेत. वर-वर पाहता, हा परिवार नेहमीच राजकारणातीत आहे असे वाटते परंतु त्यांचे 'खायचे दात वेगळे अन् दाखवायचे दात वेगळे' आहेत, हे गेल्या पन्नास वर्षात सर्वांनाच पूर्णपणाने कळून चुकले आहे. आता मोहनराव भागवतांच्या नेतृत्वाखाली तो काही वेगळे रंग दाखवेल आणि 'सांस्कृतिक चळवळ' हा आपला मुखवटा न ठेवता चेहेरा बनवेल, अशी सुतराम शक्यता नाही.

आजवर आपली सर्व राष्ट्रीय (वर्ग, राजकीय) उद्दिष्टे व कार्यक्रम यांचा पाठपुरावा या परिवाराने भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून केला आहे आणि आता तर काय, अटलजींसारखा सम्यकदृष्टीचा उदारमनस्क नेता निवृत्त झाल्यामुळे हे माध्यम आपल्याला हवे तसे वापरण्यासाठी त्याला रानच मोकळे मिळाले आहे. सर्वधर्म समभावावर आधारित भारतीय लोकशाहीच्या दृष्टीने ही 'धोक्याची घंटाच' आहे, याबद्दल आमच्या मनात तरी तीळमात्र शंका नाही. या घंटेची ताकद (खरे तर, उपद्रवमूल्य) माहित असल्यामुळेच की काय, खुद्द अडवानींनी 'आज मी जो काही आहे तो केवळ संघामुळेच,' अशी कबुली नुकतीच पुन्हा एकवार दिली आहे. त्यांची ही कबुली रा.स्व. संघ व भाजप यांचे अभिन्नत्व तर स्पष्ट करणारी आहेच परंतु यापुढील काळात संघाची भाजपवरील पकड अधिक मजबूत होणार, याचे संकेत देणारीही आहे.

●●●





# बहुजनांचे क्षेपणास्त्र

- **प्रा. लक्ष्मण ढोबळे**

*अध्यक्ष, महा. राज्य खादी ग्रामो. मंडळ, मुंबई*

मायावती चमत्कार मोठा असून उत्तरप्रदेशातील सामाजिक न्याय वेगळा आहे. पोलीस, धनिक आणि माजोरी गुंड एकत्रपणे गरीबांचे गळे कापत असतात. दलितांची सामुदायिक कत्तल करुन आपली सरदारकी टिकविण्यात धन्यता मानतात. अशा ठिकाणी संस्थापक कांशीरामजीने अत्यंत जाणीवपूर्वक केलेले कष्ट कामी आले आणि त्या प्रयत्नातून नवी वीट नवे राज्य उभे राहिले यात शंका नाही. परंतु सत्ता आणि संपत्तीच्या जोरावर देशाचे राजकारण विकत घेऊ अशा भ्रमात राहून काही नवी गणिते मांडली जात आहेत. या गणिताचा परिणाम पुरोगामी महाराष्टावर कसा होणार हे पाहायला हवे.

उत्तरप्रदेशात दलित, ब्राह्मण एकत्र आल्यावर सत्ता येणार असे चित्र निर्माण झाल्यामुळे मुस्लीम बांधवही सोबत आले आणि उत्तर प्रदेशातील सामाजिक गणित जमून गेले. बलाढ्य अशा खंडप्राय प्रदेशात सत्ता काबीज करता आली हे खरे परंतु महाराष्ट्रात तशी परिस्थिती नाही. फुले, शाहू, आंबेडकर, लोकहितवादी आगरकर, सावरकर या धुरीणांनी मोठ्या कष्टाने सामाजिक उत्थापनाचा विचार मांडला, आणि फलद्रुपही केला. स्वातंत्र्य, समता, बंधुता यांच्या जोरावर सामाजिक न्यायाच्या पार्श्वभूमीवर परिवर्तनाचे जागरण झाले आणि पुरोगामी राज्य म्हणून देशभरात महाराष्ट्र आघाडीवर राहिला हा आपल्या कौतुकाचा विषय आहे. सामाजिक बांधीलकी मान्य करु, तेजाळलेल्या नव्या विचाराची कास धरुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली अवघा दलित माणूस एकसंघपणे उभा राहिला आणि तेजाळलेले राजकारण गतिमान झाले. आंबेडकर चळवळीतील तरुण कर्तबगार अनुयायांनी देशाच्या कानाकोपऱ्यात डॉ. बाबासाहेबांचे विचार पोहचविलेच परंतु सातासमुद्राच्या पलिकडेही जगभरात जातीअंताची लढाई करत प्रखर राष्ट्रवादाची भूमिका सांगत जातीचे आणि गरीबीचे निर्मूलन हा बाबासाहेबांच्या विचाराचा मूलभूत पाया असल्याचे जगाला दाखवून दिले. तुच तुझा मार्गदर्शक हो 'अंत दिप भवं' या जाणीवेने पुढे निघालेला दलित वर्ग मायावतींच्या मायाजाळाला बळी पडेल असे वाटत नाही. बसपाच्या ब्रह्मास्त्राला बहुजनांचे क्षेपणास्त्र रोखू शकेल असा आत्मविश्वास वाटतो. कारण महाराष्ट्रातील परिवर्तनवादी चळवळीला १५० वर्षाची भक्कम अशी परंपरा असून वैचारिक बैठक पक्की आहे. त्यामुळे

**“कसेही करा, काहीही करा आणि सत्ता मिळवा. कधी भाजपाबरोबर, कधी समाजवादी बरोबर, कधी काँग्रेसबरोबर वाटेल ते करा पण सत्ता हस्तगत करा. कोणताचा विधिनिषेध न पाळता केलेले राजकारण म्हणजे सोशल इंजिनिअरींग असे नवे रुप बसपाच्या राजकारणाने धारण केले असून दुबळ्या आणि उपेक्षित माणसाच्या भल्यासाठी काम करण्यापेक्षा सत्तेसाठी काम करणे अधिक चांगले हे बसपाने फार पूर्वीच ठरविले आहे. त्यामुळे उत्तर प्रदेशातील सामान्य माणूस या राजवटीने आम्हा दलितांचे काय भले केले? असा थेट प्रश्न आता विचारु लागला आहे. महाराष्ट्रात जो जो माणूस जाळ्यात अडकला त्या सर्वांना राज्यसभेचे गाजर दाखवून जाळ्यात ओढतांना काही असंतुष्टांना संपर्कात ठेवले जाते. तो मासा धनिक असली पाहिजे. त्याच्या मागे मोठा समाज असला पाहिजे. न्यूसन्स व्हॅल्यू असला पाहिजे. असे मासे शोधून जाळ्यात पकडले जातात. त्या धनिकांना पुढे करुन बिनभांडवली राजकारण उभे केले जाते. त्यामुळे सध्या अनेक पक्षातील बंडखोर हेच बसपाचे शिलेदार.”**

*बसपाच्या ब्रह्मास्त्राला बहुजनांचे क्षेपणास्त्र रोखेल काय?*



पुरोगामी महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये उत्तर प्रदेशच्या राजकारणाचा उतारा लागू पडेल असे मुळीच वाटत नाही. बसपाने पुण्यातून कुलकर्णी, रत्नागिरीतून परुळेकर, नाशिकमधून पुजारी, ठाण्यातून त्रिपाठी असे उमेदवार निवडले असून दलित आणि ब्राह्मण एकत्र आल्यानंतर ओ.बी.सीच्या जोरावर महाराष्ट्रात नवे राजकारण मांडता येईल असे बहेनजींना वाटत असले तरी महाराष्ट्रातला दलित, ओ.बी.सी., आदिवासी हे कधीच मान्य करणार नाही. मुस्लीम बांधवांना तर अशी चर्चादेखील सहन होणार नाही. कारण बसपाला पूर्णपणे उत्तरप्रदेशातल्या ब्राह्मणांनी घेरले असून इतर समाजाला डावलण्यात आले आहे. त्यामुळे सत्ता आल्यानंतर आमचे भले होईल अशी वाट पाहत बसलेला दुर्लक्षित वर्ग बसपावर कमालीचा नाराज आहे.

ब्राह्मण, मराठा, मुस्लीम, ओ.बी.सी., दलित आणि आदिवासी यांची मोट बांधून अरुण गवळीच्या हाती दिल्यानंतर कोणत्या विहिरीतले पाणी त्यात भरणार हा मुद्दा वादात भर घालणारा आहे. उत्तरप्रदेश सारख्या बलाढ्य राज्याचा मुख्यमंत्री म्हणून मायावतींच्या राजकारणाला एक नवी किनार लाभणार, कर्तृत्वाची जोड मिळणार, दलित ओ.बी.सी. यांना आधार लाभणार अशी अपेक्षा होती. पण निराश झालेले हे सगळे वर्ग आता परतीच्या मार्गाला निघाले आहेत. भ्रमात असलेला बसपा दिल्लीचा राज्यभिषेक करताना डी.एस.के. गागाभट्टाचे नांव घेऊन राज्यभिषेकाला हजर राहणार असा अभास निर्माण करण्याचा प्रयत्न होत आहे. परंतु एकंदरीत विळ्या भोपळ्याची वीट बांधून नवे सोशल इंजिनीअरिंग करणे हा केवळ चिंतेचा नव्हे तर चिंतनाचा विषय आहे. अनेक उच्चभ्रू प्रस्थापितांना तिकीटे देऊन दलितांना पालखीचे भोई करण्यात मायावतीजींना यश आले असले तरी दलितांचे हक्क बहेनजी हिरावून घेतायेत आणि चार ब्राह्मण उमेदवारांना कवच कुंडले बहाल करतायेत अशी चर्चा बसपाच्या कार्यकर्त्यांमध्ये सुरु झाली आहे. बहुजन अस्त्रापेक्षा ब्रह्मास्त्राचा जोर वाढणार असे सुरुवातीला वाटत होते. परंतु दलितांच्या कल्याणाचा निर्णय घेऊन अन्यायग्रस्तांना न्याय देण्याबद्दलची प्रक्रिया सुरु होईल असे वाटले होते. परंतु कांशीरामाच्या आशिर्वादाने मिळालेले राज्य केवळ शिडीसारखा वापर करुन दिल्ली कशी गाठता येईल हेच बहेनजींनी गेल्या वर्षभरात पाहिले आहे. उपेक्षितांच्या कल्याणापेक्षा प्रधानमंत्री महत्वाचा याकडे बसपाचा कल अधिक असून सध्यातरी दलित, ओबीसी, मुस्लीम यांना विश्वासात घेऊन राज्य करण्यापेक्षा बहेनजी भोवतीचे ब्रह्मास्त्र कोणत्याच उपेक्षित नेत्याला जवळ फिरकू देत नाही हे खरे आहे.

महाराष्ट्रात अनेक संतांनी पुरोगामीचा वसा घेतलेल्या धर्मांनी समुह जीवनाचे प्रतिक असलेल्या सेवा योजनाचा प्रचार, प्रसार मोठ्या हिमतीने केला आहे. त्यामुळे १५० वर्षापासून सुरु

असलेले सोशल इंजिनीअरिंग मोठ्या भक्कमपणे महाराष्ट्राच्या मातीत रुजले आहे. या ठिकाणी दलितांचा सत्तेतील सहभाग, सहकारातील भागीदारी, संस्कृती, कला, शिक्षण या सर्वच क्षेत्रात सामाजिक न्याय आणि त्याचे संरक्षण अबाधित राखण्याचा प्रयत्न झाला असून कर्मठांच्या विरोधात चिरेबंदी अशी भक्कम फळी सतत उभी राहिली असून अशा संघर्षमय राजकारणाचे नेतृत्व फुले, आंबेडकरांनी मनापासून केले आहे. त्यामुळे शेकडो वर्षापासून विधायक आणि वैचारिक परिवर्तनाचा सुरु असलेला संघर्ष उत्तर प्रदेशाच्या या सर्व परिस्थितीला सामोरे जाताना पुरोगामी महाराष्ट्राचा दलित बळी पडेल असे वाटत नाही. अर्थात मायाजाल अगाध असले तरी सत्ता संपत्तीच्या जोरावर राजकारण विकत घेता येतेच असे नाही. सोशालिझम मधील इझम किती वाढविणार याचे भान ठेवून दुबळ्या माणसाला ही चळवळ कोठे घेऊन जाणार याची चिंता वाटते. उपेक्षित दुबळ्यांना आपला आवाज प्रभावीपणे मांडण्यासाठी महाराष्ट्रात अनेक व्यासपीठ आहेत परंतु उत्तरप्रदेशात मात्र असे व्यासपीठच उपलब्ध नाही. त्यामुळे त्या ठिकाणाचा संघर्ष आरपार होता म्हणून महाराष्ट्रातील दलितांवरचे अत्याचाराबाबत वेगळ्या पातळीवर विचार होणे आवश्यक आहे.

कसेही करा, काहीही करा आणि सत्ता मिळवा. कधी भाजपाबरोबर, कधी समाजवादी बरोबर, कधी काँग्रेसबरोबर वाटेल ते करा पण सत्ता हस्तगत करा. कोणताचा विधिनिषेध न पाळता केलेले राजकारण म्हणजे सोशल इंजिनीअरिंग असे नवे रुप बसपाच्या राजकारणाने धारण केले असून दुबळ्या आणि उपेक्षित माणसाच्या भल्यासाठी काम करण्यापेक्षा सत्तेसाठी काम करणे अधिक चांगले हे बसपाने फार पूर्वीच ठरविले आहे. त्यामुळे उत्तर प्रदेशातील सामान्य माणूस या राजवटीने आम्हा दलितांचे काय भले केले? असा थेट प्रश्न आता विचारु लागला आहे. महाराष्ट्रात जो जो माणूस जाळ्यात अडकला त्या सर्वांना राज्यसभेचे गाजर दाखवून जाळ्यात ओढतांना काही असंतुष्टांना संपर्कात ठेवले जाते. तो मासा धनिक असला पाहिजे. त्याच्या मागे मोठा समाज असला पाहिजे. न्यूसन्स व्हॅल्यू असली पाहिजे. असे मासे शोधून जाळ्यात  पकडले जातात. त्या धनिकांना पुढे करुन बिनभांडवली राजकारण उभे केले जाते. त्यामुळे सध्या अनेक पक्षातील बंडखोर हेच बसपाचे शिलेदार. उपद्रवमूल्य वाढविण्याचा प्रयत्न मोठ्या कष्टाने रेटला जात आहे, त्यामुळे सध्या अनेक पक्षातील बंडखोर आणि संतुष्ट महत्वाकांक्षी नेते बसपाच्या गळाला अडकले असून अशा नेत्यावरील हिप्नॉटिझम यशस्वी झाले आहेत. पुढील १० वर्षात पहिल्यांदा पडा, मग पाडा, त्यानंतर शक्य झाले तर जिंका या त्रिकुटीवर बसपाचे राजकारण उभे असून जे लोक राजकारणात नाहीत परंतु उद्योगधंद्यात उत्कृष्ट कामगिरी केली आहे अशा लोकांना सत्तेचे अमिष दाखवून त्यांना राजकारणात ओढून अशा सामाजिक प्रतिमांची आणि उद्योगाची ढाल करुन राजकीय पोळी भाजण्याचा प्रयत्न केला जात आहे. परिवर्तनवादी विचाराची कास धरुन सामाजिक जाणीवेची पताका खांद्यावर घेऊन प्रखर अक्षर वाड:मयाची निर्मिती करणारे कुसुमाग्रज, तर महाडच्या चवदार तळ्यात सत्याग्रह करताना तळे सर्वांना खुले व्हावे म्हणून ठराव मांडणारे बिनीचे सरदार चिटणीस अशा अनेकांनी महाराष्ट्र मोठा केला, वाढवला. परिवर्तनासाठी राज्याचा राजदंड वापरणारे शाहू महाराज, सत्ता हे सेवेचे केंद्र झाले पाहिजे असा आग्रह धरणारे कै. चव्हाणसाहेब या सर्वच क्षेत्रात आंबेडकरवाद्यांनी घडविलेली स्थित्यंतरे, विविध आंदोलनांचा सहभाग यामुळे महाराष्ट्राचे बऱ्यापैकी जागरण झाले आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या पुरोगामी मातीची मशागत आणि तीची डागडूजी सतत होत आली आहे. उच्चभ्रू समाजातील चार उमेदवार देऊन प्रचाराची व नेतृत्वाची धुरा अरुण गवळी सारख्या एका अचूक नेमबाजाकडे देऊन बहेनजीचे मोठे औचित्य साधले आहे. त्यामुळे हत्तीवर बसून येणारे अरुण गवळी असोत, गुत्तेदारीतले प्रसिद्ध व्यक्तीमत्व डी.एस. कुलकर्णी असोत. यांच्या अंगणात बांधलेला हत्ती कोणत्या उपेक्षित आणि दुबळ्या माणसाचे कल्याण करणार हे आता काळच ठरविणार आहे.

'पडा-पाडा- त्यानंतर निवडून या' अशा त्रिसूत्रीने भाजपला फायदा होण्याची शक्यता अधिक आहे. कारण पाडापाडीच्या राजकारणात धर्मनिरपेक्ष मतांचे विभाजन होईल आणि सरळ फायदा भाजपला होईल. कारण गेल्या निवडणुकांमध्ये भाजपातील एका धनिकाने दलित नेत्याच्या मदतीने काही उमेदवारही उभे केले होते हे उघड सत्य आहे. वार्डात, झेडपीत, विधानसभेत पंधराजण भांडून पराभूत होतात. ज्याला कळतो तो मागे राहतो आणि जो माळावरचा दगड आहे अपसूक त्याला संधी मिळते. फुले, शाहू, आंबेडकरांच्या स्वप्नातला महाराष्ट्र उभा करायचा असेल तर श्रमाला प्रतिष्ठा देऊन मतभेदाला मूठमाती देऊन विचारांचे जागरण लोकांपर्यंत गेले पाहिजे. सर्वांनी एकत्र येऊन सार्वत्रिक समस्यावर उपाय योजले पाहिजेत यात शंका नाही. धर्माच्या मातीवर, भाषेच्या धर्तीवर, जातीच्या नितीवर उमेदवार उभे करुन फोडा झोडाचे राजकारण तर जुनेच आहे यावर उपाय म्हणून धर्मनिरपेक्ष मताचे विभाजन टाळावे हे अधिक चांगले. नाही तर जातीवाद्यांचे भूत गाडून टाकणे अशक्य होईल.

●●●

# नरेंद्रभाईंचा नवा 'जावईशोध' अर्थात 'भुताहाती भागवत'



**- हेमंत टकले**

*आमदार व कोषाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस*

**काँग्रेसच्या जाळ्यात अलगद अडकल्यामुळे पंतप्रधानपदी येण्याचे शरद पवार यांचे स्वप्न यावेळीही साकार होणार नाही' असा 'जावईशोध' गुजरातचे बदनाम मुख्यमंत्री नरेंद्र मोदी यांनी नुकताच लावला आहे. राजधर्माचे पालन करण्यात साफ अपयशी ठरलेल्या या भाजप नेत्याने काही तांत्रिक मुद्दे व राजकीय संकेतांचा आश्रय घेऊन केलेला सोईस्कर युक्तीवाद म्हणजे अन्य काही नाही तर 'भुताहाती भागवत' असाच प्रकार आहे.**

गुजरातचे 'मौत का सौदागर' मुख्यमंत्री आणि भारतीय जनता पक्षाच्या महाराष्ट्रातील प्रचार यंत्रणेचे कावेबाज सूत्रधार नरेंद्र मोदी यांनी नुकताच पुण्यातील जाहीर प्रचार सभेत एक नवा 'जावईशोध' लावला. महाराष्ट्राचे सर्वोच्च नेते शरद पवार यांना देशाचे पंतप्रधानपद मिळणे अजिबात शक्य नाही, कारण त्यांची अशी कोंडी करण्यासाठीच काँग्रेसने राष्ट्रपतिपदी श्रीमती प्रतिभा पाटील या मराठी महिलेची निवड केली आहे. राजकीय संकेतानुसार देशाची दोन सर्वोच्च सत्तापदे एकाच राज्याकडे कधीच जात नसल्यामुळे आता पंतप्रधानपदी मराठी माणूस आणण्याचे महाराष्ट्राचे स्वप्न कदापीही साकार होणार नाही. काँग्रेसच्या जाळ्यात अडकून पवारांनीच हे स्वप्न उद्ध्वस्त केले आहे', अशा प्रकारची सर्वथा बालिश वक्तव्ये करून मोदी महोदयांनी आपला हा 'जावईशोध' जनतेसमोर मांडला

आगामी सार्वत्रिक निवडणुकीनंतर पंतप्रधानपदी कोण येणार, या प्रश्नाचा खल तसा महत्त्वपूर्ण असला तरी देशातील सर्व छोट्या-मोठ्या राजकीय पक्षांचे सध्याचे बलाबल लक्षात घेता त्याबद्दल आत्ताच काही ठाम विधाने करणे हे सुतावरून स्वर्ग गाठू पाहण्याइतके अप्रबुद्धपणाचे आहे. गेल्या दीड-दोन दशकात संधीसाधू आघाड्यांच्या राजकारणाने देशाच्या पंतप्रधानपदाला अन्य काही नाही तर 'संगीत खुर्चीच्या खेळाची' पोरकट कळा प्रापत करून दिली असून, आता आगामी निवडणुकीत कोणताही एक पक्ष वा आघाडीस निर्विवाद बहुमत मिळण्याची शक्यता नसल्याने त्या खेळास पुन्हा एकदा जोर येणार आहे. या स्थितीत पवारसाहेबांसारख्या सर्वद्रष्ट्या समर्थ, कर्तबगार व लोकप्रिय नेत्याने पंतप्रधानपदाच्या शर्यतीत उतरावे आणि ते पद मिळवून महाराष्ट्राच्या शिरपेचात एक नवा अभिमानास्पद तुरा खोवावा, अशी आकांक्षा केवळ राष्ट्रवादी काँग्रेसजनांनी नाही तर तमाम मराठी जनतेने बाळगली, तर त्यात गैर ते काय आहे? महाराष्ट्राच्या शेजारी राज्यांतील - कर्नाटक, आंध्रप्रदेश, गुजरातचे काही धूर्त नेते जनमताचा फारसा पाठिंबा व अंगी विशेष गुणवत्ता नसतानाही हे सर्वोच्च सत्तापद मिळवू शकतात तर मग पवारसाहेबांसारख्या कर्तृत्ववान मराठी नेत्यांना तो हक्क का नाकारला जावा? केंद्रीय राजकारणात महाराष्ट्राला कायम सापत्नभावाची वागणूक मिळत आली आहे आणि आताही तथाकथित संकेत तांत्रिक मुद्दे व प्रथा-परंपरांच्या नावाखाली पवारसाहेबांना पंतप्रधानपद नाकारून,



आहे. खरे तर निवडणुकीच्या प्रचारासाठी आयोजित केलेल्या सभेत त्यांनी आपल्या भाषणाचा संपूर्ण भर पक्षाची ध्येयधोरणे, त्याची आजवरची भली-बुरी कामगिरी आणि जनकल्याण व राष्ट्रहिताचे भावी कार्यक्रम विशद करण्यावर ठेवणे अपेक्षित होते; परंतु त्या आघाडीवर फारसे काही सांगण्यासारखे नसल्यामुळे काही काय, अखेर तमाम मराठी जनतेच्या अभिमानाचा विषय असलेल्या पवारसाहेबांच्या दिशेने दुगाण्या झाडून त्यांना वेळ मारून न्यावी लागली.



*गुजरातच्या दंगलीत जागोजागी असे निरपराध लोकांचे बळी गेले.*

# बतावणी 'सोंगाड्या' मुंड्यांची

पुण्यातील सभेत मोदींच्या बरोबरीने भाजपचे महाराष्ट्रातील नेते गोपीनाथ मुंडे यांचेही आक्रस्ताळे, बेलगाम भाषण ऐकायला मिळाले. ही निवडणूक शिरूर मतदारसंघातून लढविण्याची घोषणा पवारसाहेबांनी आधी केली होती. त्याचा संदर्भ देऊन मुंडे म्हणाले की, ''शिरूरमध्ये पराभव होणार हे लक्षात आल्यामुळेच आता तेथून पळ काढून पवार माढ्याकडे वळले आहेत. देशाचे पंतप्रधानपद भुषवू इच्छिणाऱ्या नेत्यास हा पळपुटेपणा शोभणारा नाही!''

महाराष्ट्राच्या राजकारणात गेली ४० वर्षे खंबीरपणे पाय रोवून उभ्या असलेल्या पवारसाहेबांबद्दल हे 'अकलेचे तारे' तोडतांना मुंड्यांना स्वत:च्या लायकीचा पूर्ण विसर पडला होता, असेच म्हणायला हवे! आपल्या कर्तबगार मेव्हण्याचे - कै. प्रमोद महाजन यांचे बोट धरून राजकारणात बस्तान बसविलेल्या या नेत्याकडे आज खुद्द त्याचे स्वपक्षीयच 'तमाशाच्या फडांवर रेंगाळणारा सोंगाड्या' म्हणून पाहतात. त्याचे एकंदर मर्यादित कर्तृत्व आणि अशुद्ध वक्तृत्व लक्षात घेऊनच तर आता भाजपच्या नेत्यांनी महाराष्ट्रातील प्रचाराची सारी सूत्रे त्याच्याकडून काढून घेऊन नरेंद्र मोदींकडे सुपूर्द केली आहेत. निदान आता तरी पवारसाहेबांच्या डोळ्यातील कुसळाची उठाठेव करण्याऐवजी मुंड्यांनी स्वत:च्या टाळक्यात बसलेल्या मुसळाची चिंता करावी अन्यथा 'तेलही गेलं, तूपही गेलं अन् हाती धुपाटण आलं' अशा अवस्थेत अडकून त्यांनाच पळता भुई थोडी होईल.

मागील पानावरून पुढे चालू या पद्धतीने तोच तो 'रडीचा डाव' पुन्हा खेळला जात आहे. अर्थात असे केले नाही तर या निवडणुकीत आपली खैर नाही, याची कल्पना असल्यामुळेच मोदींनी या खेळात विशेष पुढाकार घेतला आहे, असे दिसते. खरे तर राजकारणातील आदर्श आणि राजकीय संकेत यांची भाषा या वाचाळ गृहस्थाने करणे म्हणजे 'भुताहाती भागवत' असाच प्रकार आहे. गेल्या दशकभरात गुजरातसारख्या शांतताप्रिय, पुरोगामी राज्यात जातीयवादी, विध्वंसक राजकारणाचा वणवा पेटविणारा हा नेता म्हणजे अन्य काही नाही तर चक्क भारतीय लोकशाहीवरील कलंक आहे. गोध्रा हत्याकांडानंतर राज्यात कायदा-सुव्यवस्था व शांतता प्रस्थापित करण्याचे कर्तव्य पार पाडण्याऐवजी हातातील सत्तेचा उपयोग शेकडो निरपराध मुस्लिमांचे जिवित-वित्त धोक्यात आणण्यासाठी करून मोदींनी आपली 'औकात' यापूर्वीच सिद्ध केली आहे. या निषेधार्ह पूर्वचारित्र्यामुळेच गेल्या ४ वर्षांत अनेकदा प्रयत्न करूनही त्यांना अमेरिकेचा 'व्हिसा' मिळू शकलेला नाही; परंतु त्याची लाज वाटण्याऐवजी हा माणूस पवारसाहेबांसारख्या राष्ट्रीय नेत्याची खिल्ली उडविण्यात धन्यता मानत आहे. अर्थात अशी क्षुद्र बुद्धीची आणि वाकड्या चालीची माणसे सत्तापदी पोचली की त्यांची अवस्था 'आधीच मर्कट तशात मद्य प्याला' अशी काहीशी होणे अपरिहार्यच असते. या मर्कटांकडे



पवारसाहेबांचे मोठेपण जाणण्याची क्षमता नाही, हे तर उघडच आहे. परंतु आपले सर्वोच्च नेते अटलबिहारी वाजपेयी यांचा पवारसाहेबांकडे पाहण्याचा दृष्टीकोन काय होता याचे किंचित स्मरण केले तरी मोदींच्या अल्पज्ञानात बरीच भर पडू शकेल.

१९९९ च्या निवडणुकीत भाजप व त्याच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीस चांगले बहुमत मिळाल्यानंतरही, आपल्या सरकारला अधिक स्थैर्य प्राप्त व्हावे म्हणून अटलजी अन्य कोणाचे नाही तर पवारसाहेबांचेच सहकार्य मिळविण्याच्या प्रयत्नात होते. विशेष म्हणजे त्यात अपयश आल्यानंतर त्यांनी मोदींच्याच गुजरातमध्ये झालेल्या प्रलयंकारी भूकंपाचे निमित्त घेऊन केंद्रात खास 'आपत्कालीन उपाययोजना समिती' स्थापन केली आणि त्याचे अध्यक्षपद पवारसाहेबांकडे सोपवून त्यांना 'कॅबिनेट मंत्र्यांचा दर्जाही दिला. पवारसाहेबांचा प्रदीर्घ अनुभव, उत्तम प्रशासन कौशल्य आणि स्वयंभू नेतृत्वगुण यांचा उपयोग राष्ट्रउभारणीच्या कार्यासाठी योग्यप्रकारे व्हावा या उद्देशानेच अटलजींनी ते पाऊल उचलले होते.



आज महाराष्ट्राची बौद्धिक राजधानी मानली जाणाऱ्या पुणे शहरात येऊन पवारसाहेबांच्या महत्त्वाकांक्षा व स्वप्नांची टर उडवू पाहण्याचे औद्धत्य करण्यापूर्वी मोदींनी हा अगदी अलिकडचा त्यांच्याच साक्षीने घडलेला इतिहास आठवला असता तर आपल्या बेताल जिभेला आवर घालणे त्यांना निश्चितच शक्य झाले असते. अर्थात ते काय बोलतात वा काय करतात यावर पवारसाहेबांचे भवितव्य अजिबात अवलंबून नाही, हे सारेच जण जाणतात. गेली तब्बल चार दशके महाराष्ट्राच्या व देशाच्या राजकारणात वावरताना मुख्यमंत्रिपदापासून संरक्षणमंत्री व कृषिमंत्रीपदापर्यंत अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडणारा हा अव्वल मराठी नेता आपल्या मर्यादांचे भान अगदी नेमकेपणाने राखून आहे आणि खरे तर तेच त्यांचे सर्वांत मोठे बलस्थान आहे. गेले काही दिवस राष्ट्रवादी काँग्रेसचे सारेच नेते आणि कार्यकर्ते यावेळी पंतप्रधानपद पवारसाहेबांनाच मिळाले पाहिजे, असा हट्ट करीत होते; परंतु ते पद मिळविण्यासाठी आवश्यक असलेले संख्याबळ आपल्याकडे नसल्याने आपण सध्या तरी पंतप्रधानपदाच्या शर्यतीत नाही' असे स्पष्ट करून खुद्द साहेबांनीच या वादग्रस्त विषयावर तुर्तास पडदा टाकला आहे. अर्थात त्यांनी वास्तवाची (Ground Reality) जाण ठेवून हा विषय संपविला असला तरी त्यांच्यासारख्या कर्तबगार व दूरदृष्टीच्या मराठी नेत्यास पंतप्रधानपद मिळावे, ही तमाम महाराष्ट्रवासीयांची इच्छा व स्वप्न मात्र कायमच राहणार आहे, हे निश्चित. या निवडणुकीनंतर ते स्वप्न साकार झाले तर स्वत:च्या बळावर मोठा झालेला एक स्वयंभू नेता देशाच्या सर्वोच्च सत्तापदी विराजमान झाल्याचा आनंद जनसामान्यांना मिळेलच पण आता देशाची सूत्रे केवळ 'राजधर्माचे पालन करा' असा सल्ला देणाऱ्या कोणा हतबल व्यक्तीकडे नाहीत तर त्या राजधर्माचे पालन ठोस पद्धतीने करवून घेणाऱ्या एका बलदंड राजकारण धुरंधराकडे आहेत, याचा अनुभवही मोदींसारख्या नाठाळांना निश्चितपणे येईल, याबद्दल आमच्या मनात तरी तीळमात्र शंका नाही.

●●●



# बदलणाऱ्या राजकीय समीकरणांची नांदी?

- विजय नाईक,
नवी दिल्ली

लोकसभेच्या निवडणुकीचे राजकारण, आरोप प्रत्यारोप शिगेस पोहोचले आहेत.१६ एप्रिलपासून मतदानाची प्रक्रिया सुरू होत आहे. मेच्या शेवटच्या आठवड्यात केंद्रात नव्या सरकारची स्थापना झाली असेल. कसे व कुणाचे असेल ते सरकार? कोण पंतप्रधान होणार? तिसरी आघाडी कितपत प्रभावी ठरणार?, असे प्रश्न विचारले जात आहेत. पंतप्रधानपदासाठी अनेक दावेदार असले, तरी सध्या दोन

उमेदवार रिंगणात आहेत. काँग्रेसतर्फे पंतप्रधान डॉ मनमोहन सिंग व भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवानी यांच्या नावांची औपचारिक घोषणा झाली आहे. २००४ मध्ये काँग्रेसच्या नेतृत्वाखाली केंद्रात संयुक्त पुरोगामी आघाडीचे सरकार आले, तेव्हा काँग्रेस

संसदीय पक्षाच्या बैठकीत डॉ मनमोहन सिंग यांची निवड करण्यात आली होती. काँग्रेस अध्यक्ष सोनिया गांधी यांनी त्यांचे नाव सुचविले होते. त्यामुळे त्यांच्याभोवती 'त्यागवलय' निर्माण झाले होते. सरकारच्या सर्व नाड्या हाती ठेवून, तीच प्रतिमा पुढे राहावी, असा आजही त्यांचा प्रयत्न दिसतो.

निवडणूक जाहीरनामा जारी करण्यासाठी दिल्लीत २३ मार्च रोजी झालेल्या पत्रकार परिषदेत पंतप्रधानपदासाठी पुन्हा डॉ सिंग यांचे नाव जाहीर करून संसदीय पक्षाला दोन महिने आधीच त्या जबाबदारीतून त्यांनी मुक्त केले. लोकशाही पद्धतीने संसदीय पक्षाच्या नेत्याची म्हणजेच पंतप्रधानाची निवड करण्याच्या काँग्रेसच्या वर्षानुवर्षांच्या परंपरेला हे धरून नाही. परंतु त्या सर्वेसर्वा असल्याने त्यांना प्रतिप्रश्न विचारण्याचे धाडस कुणात उरलेले नाही. डॉ सिंग यांच्या नावाची घोषणा त्यांनी नाट्यमय पद्धतीने केली. जाहीरनाम्याची पुस्तिका हातात घेऊन स्वतःच्या छायाचित्रावर तळहात ठेवून केवळ डॉ सिंग यांचे छायाचित्र त्यांनी दाखविले. यावेळी त्यांच्या शेजारी जाहीरनामा समितीचे अध्यक्ष व परराष्ट्र मंत्री प्रणब मुकर्जी बसलेले होते. अलीकडे डॉ सिंग यांच्यावर हृदय शस्त्रक्रिया झाली, तेव्हा त्यांच्या कामकाजाची जबाबदारी पूर्णपणे परराष्ट्र मंत्री प्रणब मुकर्जी यांच्यावर



**''पंतप्रधान कमकुवत आहेत'', असा अडवानी यांनी डॉ मनमोहन सिंग यांच्यावर केलेला हल्ला व त्याला डॉ सिंग यांनी दिलेले प्रत्युत्तरही गाजतेय. भारतीय जनता पक्षाने गेल्या काही वर्षात डॉ सिंग यांना 'निकम्मा', 'कळसूत्री बाहुला' अशी विशेषणे वारंवार दिली. डॉ सिंग यांनी अडवानी यांना 'संधिसाधु' म्हटले. ''बाबरी मशिद उध्वस्त करून देशाच्या कल्याणात त्यांनी कोणती भर टाकली,'' असा प्रश्न केला. संसदेवरील दहशतवादी हल्ला, लाल किल्ल्यावरील हल्ला व इंडियन एअर लाईन्सच्या विमान अपहरणानंतर दहशतवाद्यांना कंदाहारला नेणारे मंत्री (जसवंत सिंग) यांचा उल्लेख केला. ''गुजरातमध्ये अल्पसंख्याकांचे शिरकाण झाले, तेव्हा ते गृहमंत्री होते'', असाही टोला मारला. ''सल्लामसलतीसाठी डॉ. सिंग मंत्र्याला १० जनपथ येथे पाठवितात,'' अशी खिल्ली अडवानींनी उडविली. या दोन्ही नेत्यांचे देशप्रेम, सचोटीवर शंका घेता येणार नाही. परंतु युद्धात व प्रेमात जसे सारे काही माफ असते, तसे या वाक्युद्धात असावयास हवे. मोसम प्रचाराचा आहे, आरोप प्रत्यारोप चालणार. त्यांची पातळी कशी राखायची हे या दोन्ही नेत्यांना नव्याने शिकण्याची व शिकविण्याची गरज नाही.**

सोपविण्यात आली होती. ते अनेक वर्षे या पदाचे दावेदार आहेत. परंतु, सोनिया गांधी यांनी केलेल्या स्पष्टीकरणानंतर काँग्रेसमधील अन्य नेत्यांचे मार्ग बंद झाले आहेत. राहुल गांधी यांना त्या पदावर विराजमान करण्याबाबत पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांनाही त्यांनी टोलवले.

पण प्रश्न आहे, तो काँग्रेस पक्षाला सरकार बनविण्यासाठी आवश्यक असणारे बहुमत मिळणार काय? निवडणुकीच्या मैदानात जाताना 'एकला चलो रे' ची भूमिका घेऊनही सध्या बिनसलेल्या मित्रपक्षांना गोंजारण्याची वेळ निवडणुकीनंतर काँग्रेसवर येणार, हे निश्चित. तेवढे करूनही आकडा २७३ पर्यंत जाईलच, याची खात्री देता येणार नाही. राजकीय निरिक्षकांना वाटते, की वेळ पडल्यास सरकार बनविण्यासाठी तिसऱ्या आघाडीतील काही पक्षांना मंत्रीपदाची अमिषे दाखवून त्यांना ओढण्याचा प्रयत्नही काँग्रेसला करावा लागेल. ''राष्ट्रीय पातळीवर एका पक्षाचे मजबूत सरकार हवे,'' असे जाहीर करून स्वतःची राजकीय शक्ती व लोकप्रियता यांची परिक्षा पाहाण्याचे काँग्रेसने ठरविलेले दिसते. किंबहुना त्यामुळेच की काय, शरद पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, लालु प्रसाद यादव यांचे राष्ट्रीय जनता दल, रामविलास पासवान यांचा लोकजनशक्ती पक्ष, मुलायम सिंग यांचा समाजवादी पक्ष याबरोबर शेवटपर्यंत जागावाटपाबाबत रस्सीखेच झाली. अखेर मुलायम सिंग, पासवान व लालू यादव यांनी वेगळ्या चुली मांडल्या. लालू प्रसाद यादव व काँग्रेस नेत्यात इतकी कटुता निर्माण झाली, की काँग्रेसला बिहार व उत्तर प्रदेशात जनाधार नाही, असे त्यांनी सोनिया गांधी यांना परखडपणे सांगितले. तसेच, ''निवडणुकीनंतर त्यांना आपली चूक कळून येईल,''असेही विधान केले. काँग्रेसला एकाकी पाडून यादव व पासवान यांनी केलेले जागावाटप व मुलायम सिंग यांनी उत्तर प्रदेशात काँग्रेसला देवू केलेल्या मोजक्या जागा ध्यानात घेता, स्थानीय पक्ष, काँग्रेसला राजकारणातील जागा दाखवून देण्यास आता धजावलेत, हेच स्पष्ट होते.

जनता दल (संयुक्त) व भारतीय जनता पक्ष यांच्या



संयुक्त सरकारचे बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांची कारकीर्द राज्याच्या प्रगतीला लाभदायक ठरली. त्यांच्याविरूद्ध तेथील जनतेत रोष नाही, हे पाहाता लालू प्रसाद यादव व राम विलास पासवान यांच्या हाती निर्णायक जागा लागतील काय, या प्रश्नाचे उत्तर लौकरच मिळेल. पण त्यांना अपयश आल्यास राजकीय सोयीनुसार ही दुक्कल नमतेही घेईल. राष्ट्रवादी काँग्रेसबरोबर गेल्या काही दिवसात रस्सीखेच होऊन अखेर २६-२२ फॉर्म्युल्यावर सहमती झाली, याबाबत काँग्रेसच्या वर्तुळातून समाधान व्यक्त केले जाते. ''निदान जागा वाटपात आमचा वरचष्मा राहिला, हे बरे झाले,'' असे एक नेता म्हणाला. महाराष्ट्र एकेकाळी काँग्रेसचा बालेकिल्ला होता.

शरद पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना केल्यावर काँग्रेसची शक्ती क्षीण होत गेली. महाराष्ट्रात आज राष्ट्रवादी काँग्रेसचा पर्याय निर्माण झाला आहे, हे काँग्रेसच्या अनेक वरिष्ठ नेत्यांना खुपते आहे. परंतु धार्मिक व जातीयवादी पक्षांना सत्तेबाहेर ठेवण्यासाठी एकमेंकाविरूद्ध लढूनही अखेर दोन्ही पक्षांना एकत्र यावे लागते, हे गेल्या काही वर्षात निदर्शनास आले आहे. तेव्हा निवडणुकीनंतर केंद्रात व महाराष्ट्रातील विधानसभेच्या निवडणुकीनंतर सरकार बनविण्यासाठी ते पुन्हा एकत्र आले नाही, तरच नवल. राष्ट्रवादी व शिवसेना यांच्यात समझोता होण्याविषयी बातम्या येऊ लागल्या, तेव्हा काँग्रेस नेते चांगलेच संभ्रमात पडले होते. सेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी पवार यांना पंतप्रधान होण्यास पाठिंबा दर्शविला.

''महाराष्ट्राकडे पंतप्रधानपद आले पाहिजे,'' असे विधान पवार यांनी केले. त्यावेळी पवार पुढे काय करतात, अशी उत्सुकता राजकीय वर्तुळात निर्माण झाली. तथापि, ''पंतप्रधान होण्यास आवश्यक असलेल्या संख्याबळाचेही आपल्याला भान आहे,'' असे पवार यांनी स्पष्ट केल्यामुळे चर्चेस तात्पुरती स्थगिती मिळाली आहे. पवार यांचे काँग्रेसेतर विरोधी पक्षातील सलोख्याचे संबंध पाहाता, त्यांचा भर प्रामुख्याने सहमतीच्या राजकारणाकडे आहे, असे दिसते. त्याचबरोबर काँग्रेसपक्षाची सरदारकी त्यांना मंजूर नाही, असे त्यांनी वारंवार आपल्या कृतीतून दाखवून दिले आहे. सिनियर पार्टनर म्हणून केंद्रात



काँग्रेसच्या नेतृत्वाखाली गेले पाच वर्ष चाललेले सरकार राष्ट्रवादी काँग्रेस, लोकजनशक्ती पक्ष, राष्ट्रीय जनता दल, द्रमुक व पट्टल मक्कल काची या मित्रपक्षांमुळेच टिकले, याचे भानही काँग्रेसला ठेवावे लागेल व पुन्हा केंद्रात सरकार बनवायचे असेल, तर याच पक्षांची गरजही काँग्रेसला भासणार आहे.

अमेरिकेबरोबर झालेल्या नागरी अणुऊर्जा करारानंतर डाव्या आघाडीने सरकारचा पाठिंबा काढून घेतला, त्यावेळी कट्टर राजकीय विरोधक असलेल्या समाजवादी पक्षापुढेही काँग्रेसला नमते घेऊन पाठिंबा घ्यावा लागला. या सर्व पक्षांतील संबंधांचा एकमेव धागा म्हणजे सांप्रदायिकतेचा पुरस्कार करणाऱ्या भारतीय जनता पक्षाला असलेला विरोध.

१२ मार्च २००९ रोजी टुमकूर येथे तिसऱ्या आघाडीची स्थापना झाली. त्या दिवशी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस प्रकाश करात यांनी जाहीर केले, की या आघाडीचा काँग्रेस व भाजप या दोन्ही पक्षांना विरोध आहे. त्यांना पर्याय म्हणून आघाडीची स्थापना करण्यात आली. तिचे नाव येत्या काही दिवसात जाहीर होईल. आघाडीत भारतीय कम्युनिस्ट, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, जनता दल (धर्मनिरपेक्ष), तेलगू देसम, बहुजन समाज पक्ष, आण्णाद्रमुक, तेलंगणा राष्ट्र समिती, क्रांतिकारी समाजवादी पक्ष, फॉरवर्ड ब्लॉक, हरियानातील चौधरी भजनलाल यांचा जनहित काँग्रेस पक्ष या दहा पक्षांचा समावेश आहे. ती स्थापन होत असतानाच जागावाटपाबाबत भाजप व बिजू जनता दल यांच्यात बेबनाव झाल्याने आघाडीच्या आशा आणखी पल्लवीत झाल्या. तथापि, पटनाईक यांनी आघाडीप्रवेशाचा कोणताही संकेत अद्याप दिलेला नाही. आघाडीचा पंतप्रधान कोण? हा वाद निर्माण होताच, ''तो निर्णय निवडणुकीनंतर घेतला जाईल,'' असे मायावती यांनी स्पष्ट केल्याने दावेदार असूनही त्यांनी या प्रश्नावरून होणारे वादळ शमविले. प्रत्यक्षात त्या दावा करतील, तेव्हा त्यांना आघाडीतील सर्वांचा पाठिंबा मिळणार काय? हे निवडणुकीत त्यांना मिळणाऱ्या जागांवरून स्पष्ट होईल. सरकार बनविण्यात काँग्रेसला अपयश आल्यास या आघाडीबरोबर राष्ट्रवादी काँग्रेस, राष्ट्रीय जनता दल, पट्टल मक्कल काची, लोकजनशक्ती पक्ष जाण्याची शक्यता आहे काय, याचाही अंदाज राजकीय वर्तुळात घेतला जात आहे. मार्क्सवादी जनता पक्षानेही आघाडी सरकारमध्ये सामील होण्याचा संकेत दिला आहे. खुद्द प्रकाश करात यांनीच तसे विधान केले होते.



डावी आघाडी व बहुजन समाज पक्ष वगळता तिसरी आघाडी प्रामुख्याने पराभूत पक्ष व असंतुष्ट नेत्यांची, माजी मुख्यमंत्र्याची आहे. मुलायम सिंग यादव यांच्या नेतृत्वाखाली अशीच आघाडी स्थापन करण्याचा प्रयत्न काही महिन्यांपूर्वी झाला होता. पण ते आज काँग्रेस बरोबर आहेत. काँग्रेसच्या गोटानुसार, आघाडी फार काळ टिकणार नाही. वैयक्तिक हेवेदावे व प्रत्येक नेत्याची महत्वाकांक्षा पाहाता सत्तेत येण्यापूर्वी ती कोसळेल. तरीही तिची दखल काँग्रेस व भाजप या दोन्ही पक्षांना घ्यावी लागत आहे, यावरूनच तिचे तात्कालिक महत्व समजते. अलीकडे परराष्ट्र मंत्री प्रणव मुखर्जी यांनी, ''आघाडीकडे कोणतेही आर्थिक व परराष्ट्र धोरण नाही,'' अशी टीका केली.

यातील मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष व भारतीय कम्युनिस्ट पक्ष सोडला, तर दुसऱ्या कोणत्याही पक्षांकडे ही धोरणे नाही, ही वस्तुस्थिती आहे. त्यांचा राजकीय प्रभाव केवळ राज्यापुरता मर्यादित राहिला आहे. दिवसेंदिवस राजकारण मूल्य व सिद्धांतहीन बनत चालल्याने केवळ सत्ता संपादनासाठी निवडणुकीनंतर कोणतेही राजकीय समीकरण पुढे येऊ शकते. त्यात बेरीज, वजाबाकी, गुणाकार व भागाकार सारे काही पाहावयास मिळेल. दरम्यान, संमिश्र सरकारचा जमाना संपुष्टात

येण्याची सुतराम शक्यता नाही.

काँग्रेसच्या निवडणूक जाहीरनाम्याचा भर आम आदमीवर आहे. 'आम आदमी के बढते कदम, हर कदम पर भारत बुलंद' हा नारा काँग्रेसने दिला आहे. येत्या निवडणुकीत आम आदमी काँग्रेसला हात दाखविणार, की हाताला मते देणार? काँग्रेसच्या जमेची बाजू पाहू. संयुक्त पुरोगामी आघाडीने देशाला पाच वर्ष सरकार दिले. ते भ्रष्टाचाररहित नव्हते. तथापि,पंतप्रधान डॉ मनमोहन सिंग यांच्यावर भ्रष्टाचाराचा आरोप कुणी केला नाही. त्यांच्या प्रामाणिकपणाबद्दल व सचोटीबद्दल कुणी शंका व्यक्त केली नाही. त्यांच्या कारकीर्दीत आर्थिक वृद्धीचा वेग ९ टक्यांपर्यंत जाऊन पोहोचला. मोठ्या प्रमाणावर जातीय दंगे झाले नाही. कृषिव्यवस्था सुधारली. वजाबाकी पाहिली, की दहशतवादाला हे सरकार समर्थपणे तोंड देऊ शकले नाही. 'सॉफ्ट स्टेट' ही भारताची प्रतिमा अमेरिका व पाश्चात्य देशात इतकी खोलवर गेली आहे, की ''वुई आर सेफ बिकॉज इंडिया इज ॲक्टिंग लाईक ए बफर टेकींग शॉक्स ऑफ ऑल टेररिस्ट ॲटॅक्स,'' अशी प्रतिक्रिया अलीकडील अमेरिकेच्या दौऱ्यात मला ऐकावयास मिळाली. डॉ. सिंग यांचे सरकार जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किमतीना आळा घालू शकले नाही. आर्थिक विकासाचा वेग अखेरच्या काळात ढासळून ५ टक्यांवर आला. चलनवाढीचे प्रमाण शून्याखाली जाऊनही गृहिणीपुढील संकट दूर झालेले नाही. परकीय चलनाच्या शिलकीचे प्रमाण ३०० अब्ज डॉलर्सवरून २३४ अब्ज डॉलर्सपर्यंत घसरले. डाव्यांनी पाठिंबा काढून घेतल्यावर सरकार वाचविण्यासाठी त्यांना समाजवादी पक्षाची काठी घ्यावी लागली. मार्च २००९ मध्ये चार घटक पक्षांनी जागा वाटपाबाबत काँग्रेसला आंगठा दाखविला. या काळात उत्तर प्रदेश व बिहारसारख्या महत्वाच्या राज्यात काँग्रेसचे संघटन विस्कळीत झाले.




भारतीय जनता पक्षाचा ताळेबंद पाहिल्यास विरोधक म्हणून संसदेतील त्यांची भूमिका आक्रमक तशीच आक्रस्ताळी राहिली. रचनात्मक विरोध हा शब्द आता जवळजवळ इतिहास जमा झाला आहे. सरकारच्या कोणत्याही धोरणाला कधी डोळसपणे तर कधी डोळे झाकून विरोध करणे, एवढेच कार्य भारतीय जनता पक्षाने केले. अमेरिकेबरोबर झालेल्या १२३ कराराच्या विरोधात भाजप व डाव्या आघाडीने हातमिळवणी केली. अटलबिहारी वाजपेयी यांचे नेतृत्व अस्तंगत होत असले, तरी त्यांच्या इतकी लोकप्रियता, प्रगल्भता असणारे दुसरे नेतृत्व आता पक्षात उरलेले नाही. अडवानी यांचा गट, अध्यक्ष राजनाथ सिंह यांचा गट, असे वेगवेगळे गट पडले असून ऐन निवडणुकीच्या तोंडावर राजनाथ सिंग व प्रचाराचे व्यूहरचनाकार अरूण जेटली यांच्यातील विकोपाला गेलेल्या मतभेदांमुळे उच्चपातळीवर दुफळीचे चित्र निर्माण झाले. कै प्रमोद महाजन यांचे निकटवर्ती सिधांशु मित्तल यांच्यावर ईशान्य राज्यांचे कामकाज सोपविण्यात आले. यामुळे बेहद नाराज झालेल्या जेटली यांचे मन वळविण्यास व त्यांना शांत करण्यास ज्येष्ठ नेत्यांना अजूनही यश मिळालेले नाही. भाजपचा एक ज्येष्ठ नेता म्हणाला, की किमान यावेळी तरी पक्षऐक्याचे चित्र दिसावयास हवे होते. तो म्हणाला, की २००९ च्या निवडणुकीत आमची सरशी होणार नाही, हे आम्हाला ठाऊक आहे. म्हणूनच आम्ही वाट पाहात आहोत २०१२ ची. त्याचे

विश्लेषण विचारता, तो म्हणाला, ''२००९ मध्ये कोणतेही सरकार आले, तरी ते दोन तीन वर्षांपेक्षा अधिक टिकणार नाही.

शिवाय २००४ ते २००९ दरम्यान संपुआबाबत जनतेत निर्माण झालेली नाराजी आम्हाला उपयोगी पडेल. म्हणूनच आमची तयारी २०१२ साठी चालू आहे. त्या वर्षी देशाला पुन्हा मध्यवर्ती निवडणुकांना सामोरे जावे लागेल व भाजपला हुकमी बहुमत मिळेल.'' याचा अर्थ भाजपने या निवडणुकीवर पाणी सोडले आहे, असा घ्यावयाचा काय?

पीलिभीत मतदार संघातील उमेदवार वरूण गांधी यांच्या रुपाने भाजपला 'मिनी मोदी' मिळाला आहे. पण त्याला 'धरवेना व सोडवेना' अशा द्विधा मनस्थितीत पक्ष आहे. त्याने केलेल्या अल्पसंख्याक विरोधी प्रक्षोभक वक्तव्यांची दखल निवडणूक आयोगाने घेतली, व उमेदवार मागे घेण्याची सूचना केली. तेव्हा भाजपचे प्रवक्ते बलबीर पुंज आयोगावर तुटून पडले. उमेदवार मागे घेण्याची सूचना करण्याचा आयोगाला कोणचाही अधिकार नाही, हे त्यांचे म्हणणे रास्त



आहे. आयोगाने पीलिभीत मधील निवडणूक रद्द करावयास हवी होती, तथापि, राजकारणात ढवळाढवळ करण्याचा कोणताही अधिकार आयोगाला नाही, हे तितकेच स्पष्ट आहे. दरम्यान, भाजपचे ज्येष्ठ नेते मुक्तार अब्बास नकवी व शहानवाझ हुसेन यांनी वरूण गांधीवर केलेल्या टीकेकडे अडवानी यांना दुर्लक्ष करून चालणार नाही. जीना यांची प्रशंसा करून अडवानी यांनी काही वर्षापूर्वी अल्पसंख्याकांना आकर्षित करण्याचा व स्वतःची प्रतिमा अधिक मवाळ करण्याचा प्रयत्न केला होता. परंतु वरूण गांधी यांनी त्यावर मात केली आहे.



*निवडणूक आयोगातील त्रिमूर्ती.*

हे प्रकरण आता सर्वोच्च न्यायालयात जाणार असून तेथे गांधी यांच्यावरील आरोप सिद्ध झाल्यास निवडणुकीच्या ऐन तोंडावर त्यांची उमेदवारी काढून घेण्याची वेळ पक्षावर येणार.

''पंतप्रधान कमकुवत आहेत'', असा अडवानी यांनी डॉ मनमोहन सिंग यांच्यावर केलेला हल्ला व त्याला डॉ सिंग यांनी दिलेले प्रत्युरही गाजतेय. भारतीय जनता पक्षाने गेल्या काही वर्षात डॉ सिंग यांना 'निकम्मा', 'कळसूत्री बाहुला' अशी विशेषणे वारंवार दिली. डॉ सिंग यांनी अडवानी यांना 'संधिसाधु' म्हटले. ''बाबरी मशिद उध्वस्त करून देशाच्या कल्याणात त्यांनी कोणती भर टाकली,'' असा प्रश्न केला. संसदेवरील दहशतवादी हल्ला, लाल किल्ल्यावरील हल्ला व इंडियन एअर लाईन्सच्या विमान अपहरणानंतर दहशतवाद्यांना कंदाहारला नेणारे मंत्री (जसवंत सिंग) यांचा उल्लेख केला. ''गुजरातमध्ये अल्पसंख्याकांचे शिरकाण झाले, तेव्हा ते गृहमंत्री होते'', असाही टोला मारला. ''सल्लामसलतीसाठी डॉ. सिंग मंत्र्याला १० जनपथ येथे पाठवितात,'' अशी खिल्ली उडविली.

अडवानींनी या दोन्ही नेत्यांचे देशप्रेम, सचोटीवर शंका घेता येणार नाही. परंतु युद्धात व प्रेमात जसे सारे काही माफ असते, तसे या वाक्युद्धात असावयास हवे. मोसम प्रचाराचा आहे, आरोप प्रत्यारोप चालणार. त्यांची पातळी कशी राखायची हे या दोन्ही नेत्यांना नव्याने शिकण्याची व शिकविण्याची गरज नाही. परंतु एक गोष्ट निश्चित, की डॉ सिंग हे वारंवार सोनिया गांधी यांचा सल्ला विचारीत असतील, त्यांच्यापुढे नमत असतील, तर तीच बाब भाजपलाही वेगळ्या प्रकारे लागू होते. राष्ट्रस्वयंसेवक संघाला भारतीय जनता पक्षाचे नेते मातृसमान मानतात. वाजपेयी यांनी तसे म्हटले होते. वाजपेयी यांच्या कारकीर्दीत त्यांना व अडवानी यांना वारंवार सरसंघचालक सुदर्शन यांच्याबरोबर सल्लामसलत करावी लागत होती. डॉ सिंग यांचे शक्तीस्थळ सोनिया गांधी हे असेल, तर अडवानी व अन्य भाजप नेत्यांचे शक्तीस्थळ रास्वसंघाचे नागपूर येथील कार्यालय व सरसंघचालक हे आहेत. पाकिस्तानातून जीना यांची प्रशंसा करून अडवानी परतले, तेव्हा त्यांचे पक्षाध्यक्षपद काढून घेण्यात आले. ते केवळ विरोधी पक्षनेते उरले, ही संघाचीच 'मेहेरबानी' होती. त्यानंतर गेल्या दोन वर्षात अडवानी यांची प्रतिमा सुधारली. त्याचे श्रेयही रास्वसंघ व भाजपला द्यावे लागेल.

निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाल्यावर आरोप-प्रत्यारोपांचे फड होतील. निवडणुकीच्या उडदामाजी काळे गोरे कोण आहे, याचा निकाल मतदाराला द्यावयाचा आहे. केंद्र बळकट हवे, की कमकुवत याचा निर्णय त्याला करावा लागणार आहे. यंदा युवकांची मते निर्णायक ठरणार. त्यात राहुल गांधी यांच्या करिष्म्याचीही परिक्षा होईल. प्रचार दौऱ्यात सोनिया गांधी, अडवानी, जयललिता आदी नेत्यांवर अतिरेक्यांचे हल्ले होण्याची जाहीर शक्यता गुप्तचर संस्थांतर्फे व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे त्यांना संरक्षण द्यावे लागेल. सुरक्षा यंत्रणेला फार मोठी जोखीम घ्यावी लागेल. पण केंद्र सरकार व निवडणूक आयोगाने केलेल्या तयारी कडे पाहाता निवडणुका सर्वसाधारणतः शांततेच्या वातावरणात पार पडतील असा अंदाज आहे. आयपीएलच्या स्पर्धा या काळात देशाबाहेर ठेवण्याच्या निर्णयाचे त्यामुळेच स्वागत करावे लागेल. अर्थात त्याला गृहमंत्री पी. चिदंबरम यांची ताठर भूमिका कारणीभूत होती, हे ही मान्य करावे लागेल.

●●●